रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ७४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, १ ऑक्टोबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

पनवेल महापालिकेतर्फे आरोग्य तपासणी शिबिरे/३
२६ कोटींचे अमली पदार्थ पोलिसांनी केले नष्ट/६
भारतीय तिरंदाजांची सुवर्ण हॅट्ट्रिक/८

## तरुणाईसाठी नवरात्रीत होणार आरोग्याचा जागर

**मुंबई :** बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्ये वाढणारा स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि मानसिक ताण यांसारख्या समस्या गंभीर बनत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आजार टाळण्यासाठी तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती निर्माण करण्यासाठी यंदाच्या नवरात्रोत्सवात राज्यात प्रथमच मुख्यमंत्री आरोग्य संवाद हा विशेष नऊ दिवसांचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमांतर्गत राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांशी थेट आरोग्यविषयक संवाद साधून मार्गदर्शन करणार आहेत. राज्यातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला आणि इतर सर्व विद्याशाखांतील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. **(सविस्तर पान २ वर..)**

# मोदी सरकारची शेतकऱ्यांना भेट

## गव्हासह सहा पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारकडून मोठी खूशखबर समोर आली आहे. केंद्राने गव्हासह सहा प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यास मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.३०) दिल्लीत झालेल्या आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नैसर्गिक संकटाशी झुंजणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गव्हाच्या एमएसपीमध्ये प्रतिक्विंटल २५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. यामुळे २०२७-२८च्या रब्बी मार्केटिंग हंगामासाठी गव्हाचा एमएसपी वाढून २,६१० रुपये प्रतिक्विंटल झाला आहे. यापूर्वी २०२६-२७मध्ये गव्हाचा एमएसपी २,५८५ रुपये प्रतिक्विंटल होता. सरकारने म्हटलेय की, या निर्णयाचा उद्देश शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला चांगला भाव मिळवून देणे आणि उत्पादन खर्चाच्या तुलनेत पुरेसा मार्जिन सुनिश्चित करणे हा आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, गव्हाचा उत्पादन खर्च सुमारे १,२६४ रुपये प्रतिक्विंटल आहे. त्याच्या तुलनेत सरकारने २०२७-२८साठी एमएसपी २,६१० रुपये प्रतिक्विंटल निश्चित केला आहे. म्हणजेच गव्हाचा



एमएसपी उत्पादन खर्चाच्या दुपटीपेक्षाही अधिक आहे. गहू हे देशातील प्रमुख रब्बी पीक आहे. त्याची पेरणी साधारणपणे ऑक्टोबरपासून सुरू होते, तर एप्रिलपासून कापणी सुरू होते. त्यामुळे नव्या एमएसपीची घोषणा शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची मानली जात आहे.

सरकारने इतर पाच रब्बी पिकांच्या एमएसपीमध्येही वाढ केली आहे. त्यानुसार करडई ₹६,५४० वरून ₹७,२१५ (₹६७५ वाढ), मोहरी ₹६,२०० वरून ₹६,६१३ (₹४१३ वाढ), मसूर ₹७,००० वरून ₹७,३९० (₹३९० वाढ), जव ₹२,१५० वरून ₹२,२८६ (₹१३६ वाढ) आणि हरभरा ₹५,८७५ वरून ₹५,९५८ (₹८३ वाढ) अशी आकडेवारी आहे.

कृषी मंत्रालयाने २०२६-२७ पीक वर्षासाठी गहू उत्पादनाचे लक्ष्य १२.१ कोटी टन ठेवले आहे. गव्हाच्या एमएसपीमध्ये वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर सरकारचा भर उत्पादन वाढवण्यासोबतच शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य परतावा मिळवून देण्यावरही आहे.

### रब्बी हंगामासाठी एकूण ₹९०,९६२ कोटींचा मोबदला

सरकारच्या अंदाजानुसार २०२७-२८च्या मार्केटिंग हंगामात सुमारे ३२४ लाख टन रब्बी पिकांच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना एकूण ₹९०,९६२ कोटींचा मोबदला दिला जाईल. एमएसपी निश्चित करताना कृषी खर्च आणि किंमत आयोगाच्या शिफारशींचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये उत्पादन खर्चासोबतच देशांतर्गत आणि जागतिक किमतींचे कल तसेच हवामानाशी संबंधित जोखमींचाही विचार करण्यात आला आहे.

# मित्रानेच केला प्रदीप पूर्णेकर यांचा घात!

## हत्येप्रकरणी पप्या शिंदेला अटक; अन्य आरोपींचा शोध सुरू

**ठाणे : प्रतिनिधी**





मानपाड्यातील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप उर्फ बाळू पूर्णेकर यांच्या हत्येच्या वेळी कार्यालयात व त्यानंतर प्रदीप यांना रुग्णालयात नेताना हजर असलेला त्यांचा मित्र पप्या शिंदे हा कटात सामील असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. याप्रकरणी कापूरबावडी पोलिसांनी त्याला अटक केली, तर अन्य चार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

प्रदीप पूर्णेकर यांची मंगळवारी रात्री हत्या करण्यात आली. ते कार्यालयात बसलेले असताना त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. त्यानंतर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आले. याप्रकरणी त्यांचे नातेवाईक मंदार घोडके यांनी दिलेल्या तक्रारीवरून कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोळीबार व धारदार शस्त्राने वार करून पूर्णेकर यांची हत्या करण्यात आल्याचे फिर्यादीच्या जबाबात नमूद करण्यात आले असून या तक्रारीत त्यांचा मित्र पप्या शिंदे यानेच हत्या केल्याचा आरोप करण्यात आला आहे तसेच पोलिसांच्या प्राथमिक तपासातही ही बाब उघड होताच त्याला अटक करण्यात आली.

याशिवाय संशयित आरोपींमध्ये संतोष कनोजिया उर्फ टल्ली, निखिल यादव उर्फ शूटर यादव, चेहऱ्यावर पांढरा रुमाल बांधलेली एक व्यक्ती व हेल्मेट घातलेल्या व्यक्तीचा समावेश आहे. पोलीस त्यांचा विविध पथकांद्वारे शोध घेत आहेत.

## चार वर्षे फ्रिजमध्ये जतन केला मृतदेह; मुंबईतील प्रकार

**मुंबई : प्रतिनिधी**

मालाड-कुरार पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या कोकणीपाडा परिसरात असलेल्या एका डे केअर सेंटर-क्लिनिकमध्ये एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या क्लिनिकच्या एका रेफ्रिजरेटेड फ्रीजरमध्ये २०२२ साली मृत झालेल्या वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार २०२२मध्ये या वृद्ध व्यक्तीचा कर्करोगाने मृत्यू झाला होता. या मृताच्या मुला-मुलीचे वडिलांशी अतिशय जिव्हाळ्याचे नाते होते. याच कारणामुळे मृतदेह डे केअर सेंटरच्या फ्रीजरमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला होता, असे सांगितले जात आहे, मात्र इतक्या दीर्घकाळ फ्रीजरमध्ये मृतदेह ठेवण्यामागचे नेमके कारण काय होते आणि यामध्ये कुटुंबाची आणि क्लिनिकची काय भूमिका होती, याचा पोलीस तपास करीत आहेत.

# महाराष्ट्र जगाचे ‘इनोव्हेशन हब’ बनेल -मुख्यमंत्री

## द गव्हर्नन्स चॅलेंज स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार प्रदान

**मुंबई : प्रतिनिधी**

वित्त, उद्योग, उद्योजकता आणि तंत्रज्ञान क्षेत्रात देशाला नेतृत्व देणारा महाराष्ट्र आता स्टार्टअपची संख्या आणि त्याच्या क्रियान्वयन या दोन्ही बाबतींत भारताची स्टार्टअप राजधानी ठरला आहे. हे सामर्थ्य आणि तरुणांचे संशोधन महाराष्ट्राला नक्कीच भविष्यात जगाचे इनोव्हेशन हब बनवेल, असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

एनसीपीए येथील जमशेद भाभा सभागृहात गेट्स फाउंडेशन आणि समग्र संस्थेच्या समन्वयाने आयोजित द गव्हर्नन्स चॅलेंज स्पर्धेच्या चौथ्या आवृत्तीमधील विजेत्यांना मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. त्यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्रा या गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य दीपक करंजीकर उपस्थित होते. स्पर्धेविषयी समग्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव गोयल यांनी माहिती दिली.





मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, ही केवळ स्पर्धा नसून महाराष्ट्रासह देशाच्या भावी प्रशासकीय रचनेला आकार देणाऱ्या प्रतिभा आणि कल्पना शोधण्याचा उपक्रम आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, डिजिटल प्रशासन, शहरीकरण, कृषी, आरोग्य, शिक्षण, हवामान बदल आणि नवोन्मेष परिसंस्था या क्षेत्रांमध्ये नव्या पिढीचा दृष्टिकोन प्रशासनात आणण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.

देशातील एकूण स्टार्टअपपैकी १८ टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. राज्यात ३० हजारांहून अधिक स्टार्टअप असून ही संख्या देशातील सर्वाधिक आहे. राज्यातील पहिले समर्पित स्टार्टअप इन्क्युबेटर म्हणून एम-हब विकसित करण्यात येत आहे. नवी मुंबईत ३०० एकर क्षेत्रावर कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर केंद्रित इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण अंतर्गत दोन लाख युवक व व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्यात येणार असून एआय आधारित संशोधनाला चालना देण्यासाठी एआय इन्क्युबेटर्स स्थापन करण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## निवडक

### वाझेच्या जामिनाला अंतरिम स्थगिती

**मुंबई :** उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील अँटेलिया निवासस्थानाबाहेर सापडलेली स्फोटके व त्यानंतर व्यावसायिक मनसुख हिरेन याच्या झालेल्या हत्येप्रकरणी अटकेत असलेला बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझे याला जामीन मंजूर करण्याच्या विशेष न्यायालयाच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने ७ ऑक्टोबरपर्यंत अंतरिम स्थगिती दिली. त्यामुळे वाझे तूर्त कारागृहातच असेल.

### विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभाराबाबत विविध मागण्यांसाठी २ ऑक्टोबर रोजी पुण्यात आंदोलन करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांनी रद्द केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

# तब्बल तीन हजार कोटींचे ड्रग्ज जप्त

## भारताची इराणी बोटीवर लक्षद्वीपजवळ कारवाई

## पाच पाकड्यांच्या मुसक्या आवळल्या

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय तटरक्षक दल आणि गुजरात दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) तब्बल तीन हजार कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ घेऊन जाणाऱ्या एका इराणी बोटीतून पाच पाकिस्तानी नागरिकांना अटक केली. हे पाच आरोपी समुद्राच्या मार्गाने ५२६ किलो मेथाम्फेटामाइन आणि हेरॉइन मुंबईला घेऊन येत होते. सुरक्षा दलांनी लक्षद्वीपजवळ ही कारवाई केली.

एटीएसचे डीआयजी सुनील जोशी यांनी सांगितले की, गुजरातमध्ये बऱ्याच काळापासून वॉण्टेड असलेल्या एका आरोपीने नायजेरियन नागरिकाशी संपर्क साधला होता. त्या नायजेरियन व्यक्तीच्या सांगण्यावरून त्याने गुजरातमध्ये एका व्यक्तीची भेट घेतली. या भेटीनंतर 'आझाद' नावाच्या इराणी बोटीद्वारे अमली पदार्थांचा साठा भारतात आणण्याची योजना आखण्यात आली होती. त्यांनी काही आगाऊ रक्कमही हस्तांतरित केली होती.

मिळालेल्या या गुप्त माहितीनुसार पाच आरोपी इराणी किनारपट्टीवरील कोनार्क बंदराच्या परिसरातून निघाले होते आणि पाकिस्तानमधील ग्वादर किनारपट्टीजवळ एका लहान बोटीने 'आझाद' बोटीपर्यंत येऊन अमली पदार्थांचा साठा त्यांच्याकडे सोपवला होता. या माहितीच्या आधारे गुजरात एटीएसने कोस्ट गार्ड मुख्यालयाच्या ऑपरेशन्स विभागाशी समन्वय साधून संयुक्त पथक तयार करण्यात आले. तांत्रिक कारणांमुळे हे पथक कोची येथून रवाना करण्यात आले. या विस्तीर्ण क्षेत्रात चाललेली ही मोहीम सुमारे १७ दिवस सुरू होती. २५ सप्टेंबर रोजी त्यांना लक्षद्वीपच्या वायव्येस सुमारे १६० नॉटिकल मैल आणि मुंबईच्या नैऋत्येस ४९० नॉटिकल मैल अंतरावर संशयास्पद बोट आढळून आली. त्यांनी ती बोट अडवली आणि तिची झडती घेतली. झडती मोहिमेनंतर संबंधित व्यक्ती त्या बोटीसह गुरुवारी पहाटे मुंबईच्या किनाऱ्यावर पोहचल्या.

प्राथमिक चौकशीतून पाचही आरोपींची ओळख पटली आहे. मोहम्मद याकूब बलुची, शाकिरुल्ला, फरीदुल्ला, अहमद खान आणि वाहिदुल्ला खान अशी त्यांची नावे असून हे सर्वजण पाकिस्तानचे रहिवासी आहेत. त्यांनी कोनारक बंदरावरून सागरी प्रवास सुरू केला होता. काही काळ प्रवास केल्यानंतर ग्वादर बंदरावरील मासेमारी करणाऱ्या एका लहान बोटीने त्यांच्या 'आझाद' बोटीजवळ येऊन अमली पदार्थांचा साठा बोटीवर चढवला. त्यानंतर हा साठा तामिळनाडूतील एका बोटीपर्यंत पोहचवण्याचे काम देण्यात आले. यामध्ये ४०० किलो मेथाम्फेटामाइन आणि १२६ किलो हेरॉइनचा समावेश होता. याचा अधिक तपास सुरू आहे.

## पीक परिस्थितीचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश

**अलिबाग : प्रतिनिधी**

दुष्काळी स्थितीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील पीक परिस्थितीचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कृषी आणि महसूल विभागाला दिले आहेत. त्याचबरोबर दुष्काळी स्थिती लक्षात घेऊन महसूल अधिकाऱ्यांना सुट्ट्या घेण्यास मनाई करणारे परिपत्रकही त्यांनी जारी केले आहे.

राज्यातील इतर भागांच्या तुलनेत रायगड जिल्ह्यात सरासरीच्या ९१ टक्के पावसाची नोंद झाली आहे, मात्र जुलै महिन्याचा अपवाद सोडला तर जून, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. अनियमित पर्जन्यमानामुळे जिल्ह्यातील खरीपातील शेती अडचणीत येण्याची चिन्हे आहेत. श्रीवर्धन तालुका हा दुष्काळी तालुका म्हणून घोषित झाला आहे. इतर काही तालुक्यांमधील परिस्थितीही फारशी वेगळी नाही. म्हसळा, पोलादपूर, महाड, माणगाव, रोहा तालुक्यांत पावसाने ओढ दिली आहे. त्यामुळे येथील पिकेही संकटात सापडण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमधील पीक परिस्थितीचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# साताऱ्याच्या साहिलचा डबल धमाका!

## आशियाई क्रीडा स्पर्धेत जिंकली दोन सुवर्णपदके



**सातारा : प्रतिनिधी**

आशियाई क्रीडा स्पर्धेत तिरंदाजीमध्ये भारताने बुधवारी (दि. ३०) सलग तीन सुवर्णपदकांची कमाई केली. यापैकी मिश्र आणि पुरुष सांघिक प्रकारात साताऱ्यातील करंडी गावचे सुपुत्र साहिल जाधवने मोलाचे योगदान देत सुवर्णपदकांवर नाव कोरले. त्याच्या या यशानंतर त्याच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्याच्या गावी जल्लोष साजरा केला जात आहे.

साहिलच्या सुवर्णपदकामागे फक्त विजयाची गोष्ट नाही, तर अनेक वर्षांचा संघर्ष, प्रतीक्षा, निराशा आणि हार न मानण्याची जिद्द आहे. साहिल हा सर्वसामान्य कुटुंबातील असून त्याचे वडील खासगी नोकरी करतात, तर आई शिक्षिका आहे. साहिलचा धनुर्विद्येतील प्रवास इंडियन राऊंडपासून सुरू झाला. सुरुवातीपासूनच हा प्रवास सोपा नव्हता. अनेक अडचणींचा सामना करत, स्पर्धांमध्ये सहभागी होत आणि स्वतःला सतत सुधारत साहिलने धनुर्विद्येत आपली वाट तयार करण्याचा प्रयत्न केला. यानंतर त्याने कंपाउंड राऊंडमध्ये जाण्याचा निर्णय घेतला, पण कंपाउंडमध्ये प्रवेश केल्यानंतरचा काळ त्याच्यासाठी आणखी कठीण होता.

पहिल्या नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये निवड होण्यासाठी साहिलला तब्बल सहा वर्षे संघर्ष करावा लागला. सहा वर्षे म्हणजे खूप मोठा काळ. या काळात स्पर्धा झाल्या, निवड चाचण्या झाल्या, संधी आल्या आणि काही वेळा हातातून निसटल्याही. मेहनत होती, सराव होता, स्वप्न होते, पण अपेक्षित यश मात्र लगेच मिळत नव्हते. अखेर साहिलची नॅशनल चॅम्पियनशिपसाठी निवड झाली अन् तिथूनच साहिलच्या प्रवासाला नवी दिशा मिळाली.

साहिलने २०२५मध्ये जर्मनी येथे झालेल्या वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्समध्ये कंपाउंड प्रकारात वैयक्तिक सुवर्णपदक जिंकून आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण केली. त्यानंतर आशियाई आर्चरी चॅम्पियनशिप, वर्ल्ड कप यांसारख्या मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करीत त्याने आपली कामगिरी सातत्याने उंचावत नेली आणि आता आशियाई क्रीडा स्पर्धेत त्याच प्रवासाचा सर्वांत मोठा अध्याय लिहिला गेला आहे.



# नवरात्रोत्सवात जागर आरोग्याचा; तरुणाईशी साधणार संवाद

**मुंबई : प्रतिनिधी**

बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्ये वाढणारा स्क्रीन टाइम, अपुरी झोप, चुकीच्या आहाराच्या सवयी आणि मानसिक ताण या समस्या गंभीर बनत चालल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आजार टाळण्यासाठी तरुण वयापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागृती निर्माण करण्यासाठी यंदाच्या नवरात्रोत्सवात राज्यात प्रथमच 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा विशेष नऊ दिवसांचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमांतर्गत राज्यातील विद्यापीठे आणि वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक व वैद्यकीय तज्ज्ञ राज्यभरातील विद्यार्थ्यांशी थेट आरोग्यविषयक संवाद साधणार आहेत.




राज्यातील वैद्यकीय, कृषी, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला आणि इतर सर्व विद्याशाखांतील विद्यार्थी या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. प्रत्येक जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, विभागप्रमुख आणि नामवंत वैद्यकीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. तरुण वयात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास त्याचे दूरगामी दुष्परिणाम पुढील आयुष्यात जाणवू शकतात. त्यामुळे आजार झाल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजारच होऊ नयेत यासाठी योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मानसिक आरोग्याची काळजी, व्यसनांपासून दूर राहणे आणि वेळेवर आरोग्य तपासणी करण्याचे महत्त्व या संवादातून पटवून दिले जाणार आहे.

विद्यार्थ्यांनी स्वतः आरोग्याबाबत जागृत राहावे आणि ही माहिती आपल्या कुटुंब व मित्रपरिवारापर्यंत पोहोचवावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमादरम्यान बदलती जीवनशैली आणि तरुणांचे आरोग्य, संतुलित आहार, व्यायाम आणि शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य, मोबाईल, सोशल मीडिया आणि वाढता स्क्रीन टाइम, व्यसनांपासून दूर राहणे तसेच निरोगी जीवनशैली आणि आरोग्यदायी समाजनिर्मिती या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा आणि मार्गदर्शन केले जाणार आहे. 'मुख्यमंत्री आरोग्य संवाद' हा राज्यातील तरुणाईशी थेट संवाद साधणारे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

सध्याच्या बदलत्या जीवनशैलीत तरुणांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांवर त्यांच्याशी थेट संवाद साधणे ही काळाची गरज बनली आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आरोग्याशी संबंधित प्रश्न मोकळेपणाने मांडता येणार असून तज्ज्ञांकडून मिळणारी माहिती त्यांना आयुष्यभर निरोगी राहण्यासाठी अत्यंत उपयोगी ठरणार आहे.

नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत प्रत्येक दिवशी एका विशिष्ट आरोग्य विषयावर राज्यभर एकाच वेळी संवाद सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून तसेच ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थी या चर्चेत सहभागी होऊ शकणार आहेत. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे थेट निरसन केले जाणार आहे. विशेषतः मुलींच्या आरोग्य, आहारातील पोषक घटकांची कमतरता, रक्तक्षय, तसेच तरुणांमधील वाढते मानसिक दडपण, स्पर्धा परीक्षांचा ताण आणि नैराश्य या विषयांवर स्वतंत्र सत्रे घेण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी जिल्हानिहाय समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली.

# खारघरमध्ये बांधकाम साईटवरून साहित्याची चोरी

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर येथील एका बांधकाम साईटवरून तीन अनोळखी चोरट्यांनी सुमारे ७५ हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बांधकाम व्यावसायिक ज्ञानेश्वर अर्जुन खरपुरिया (५२, रा. खारघर) यांच्या सेक्टर १९ ए, प्लॉट नं. १८ येथील बांधकाम साइटवर पहाटे २ ते ३.३० वाजेच्या सुमारास ही चोरी झाली.

चोरट्यांनी साइटवरून ४० हजार रुपयांच्या कॉपर वायरचे १२ बंडल, २५ हजार रुपयांचे ॲल्युमिनियम पाईप, ५ हजार रुपयांची ड्रिल मशीन आणि ५ हजार रुपयांची कटर मशीन असा एकूण ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ज्ञानेश्वर खरपुरिया यांनी दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलिसांनी तीन अनोळखी इसमांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# रेवदंड्यात नूतन घंटागाडीचा शुभारंभ



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा ग्रामपंचायतीच्या नूतन घंटागाडीचा शुभारंभ अंगारकी संकष्टी व साखरचौथ श्री गणेश आगमनाच्या मुर्हूतावर करण्यात आला.

या कार्यक्रमास सरपंच प्रफुल्ल मोरे, ग्रामपंचायत अधिकारी राहूल पोरे, उपसरपंच संतोष मोरे, ग्रामपंचायत सदस्य खलिल तांडेल, आशा कमळ नाखवा, भारती प्रफुल्ल मोरे, किशोर मानकर, राजू चुनेकर, प्रमोद नवखारकर आदी उपस्थित होते. अलिबाग पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते.

# शिक्षणातून कर्मवीरांनी स्वावलंबी समाज घडवला -सुधीर घरत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षणाच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसाला स्वतःच्या पायावर उभे करून समाज परिवर्तनाचे महान कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत यांनी केले. पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कर्मवीर जयंती कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात सुधीर घरत बोलत होते.

ते म्हणाले की, एका वाक्यात कर्मवीरांचे कार्य सांगायचे झाले तर ते म्हणजे कर्मवीरांनी शिक्षणातून सामान्य माणसाला स्वावलंबी बनवले. यावेळी सुधीर घरत यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा आणि शैक्षणिक चळवळीतील योगदानाचा सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले की, ज्या काळात समाजातील मोठा वर्ग शिक्षणापासून दूर होता, त्या अंधकारमय परिस्थितीत कर्मवीरांनी शिक्षणाची ज्योत प्रज्वलित केली. या ज्योतीच्या प्रकाशाने शिक्षणापासून वंचित असलेल्या असंख्य सर्वसामान्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना आत्मविश्वास, स्वावलंबन आणि प्रगतीची संधी दिली.

कर्मवीरांनी केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यापुरते कार्य मर्यादित ठेवले नाही, तर अनेक विद्यार्थ्यांना शिक्षित करून त्यांना शिक्षक म्हणून घडविले. या शिक्षकांनी पुढे असंख्य विद्यार्थ्यांना ज्ञानदान करून त्यांच्या जीवनाला नवी दिशा दिली. अशा प्रकारे एका ज्ञानज्योतीतून असंख्य ज्ञानज्योती प्रज्वलित करून समाजातील अज्ञानाचा अंधकार दूर करण्याचे आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडविण्याचे महान कार्य कर्मवीर अण्णांनी केले, असेही सुधीर घरत यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळा समितीचे अध्यक्ष जीवन गावंड यांनी केले. त्यांनी शाळेची सध्याची स्थिती, विद्यार्थ्यांच्या वाढत्या गरजा तसेच भविष्यात आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची माहिती दिली. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी समाजातील मान्यवर व हितचिंतकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या संजीवनी म्हात्रे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, युनियन नेते जितेंद्र घरत, उद्योगपती देवेंद्र पाटील, आयओटीएलचे एचआर व्यवस्थापक संदीप काळे, पिरकोनच्या सरपंच कलावती पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना पाटील, डी. बी. म्हात्रे आणि रामाकांत गावंड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने मान्यवरांचे उत्साहात स्वागत केले. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे स्मरण करण्यात आले. शैक्षणिक, क्रीडा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत मान्यवरांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोजगार मेळाव्यातील संधीचा लाभ घ्या -आमदार अनिकेत तटकरे

**रोहा : प्रतिनिधी**

राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत कोकण विभागात 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ' आयोजित करण्यात आला आहे. या महाकुंभाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या संधींचा युवक-युवतींनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी केले. कोलाड-गोवे येथील तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग यांच्यामार्फत २९ सप्टेंबर रोजी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



या मेळाव्याला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ'चा ऑनलाइन शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला. त्याच अनुषंगाने तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट येथील रोजगार महाकुंभाचा शुभारंभ आमदार अनिकेत तटकरे व ट्रस्टी संदीप तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे ट्रस्टी संदीप तटकरे, रोह्याचे सहायक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे, कोलाडचे सहायक पोलीस निरीक्षक भारत फारने, जिल्हा परिषद सदस्य निधी जाधव, उपसभापती संजय मांडूलकर, तालुकाध्यक्ष महेंद्र पोटफोडे, रजिस्ट्रार अजित तेलंगे, प्राचार्य विपुल मसाल, आयटीआयचे प्राचार्य संजय हजारे, नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वास देशमुख, सुजित पाटील आदी उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी मेळाव्यास भेट देऊन पाहणी केली. रोजगार मेळाव्यात रायगड जिल्ह्यासह धाटाव औद्योगिक परिसरातील विविध नामांकित कंपन्यांसह एकूण २५ कंपन्यांनी सहभाग नोंदवला. मेळाव्यात २५८ युवक-युवतींनी उपस्थिती नोंदवली. त्यापैकी १७२ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली, तर ६८ उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे अंतिम नियुक्ती करण्यात आली. रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या या मेळाव्यामुळे स्थानिक युवक-युवतींना मोठा फायदा झाला. मेळावा यशस्वी करण्यासाठी तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# माणगावमध्ये अमृत युवा ऊर्जा कार्यक्रम उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव, रायगड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत युवा ऊर्जा' या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. युवकांमध्ये सकारात्मक विचार, आत्मविश्वास, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रनिर्मितीची भावना निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमासाठी श्रीविष्णु बुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्राचे संस्थापक सचिव सुरेश गोखले यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. तसेच अमृत संस्थेचे रायगड जिल्हा उपव्यवस्थापक मंगेश ढेबे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी मार्गदर्शकांनी युवकांनी आपल्या ऊर्जेचा सकारात्मक व विधायक कार्यासाठी उपयोग करावा, समाजाप्रति आपली जबाबदारी ओळखून राष्ट्राच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. युवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव, शिस्त व आत्मविश्वास विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

हा कार्यक्रम माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. जयशंकर पांडेय, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. एम. आचार्य आणि प्रा. सुस्मिता म्हामुणकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला.




**पनवेल : शालेय नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सांगुर्ली शाळेची यशोगाथा राष्ट्रीय पोर्टलवर प्रकाशित झाली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी भोसले यांनी या लेखातून शाळेच्या शैक्षणिक परिवर्तनाचा प्रवास मांडला आहे. याबद्दल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांनी मानसी भोसले यांचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला. यावेळी भाजप नेते सदाशिव वास्कर, अभिजित मटकर, सीताराम मोहिते आदी उपस्थित होते.**



**पेण : हरेश विनायक पाटील यांच्या घरी साखरचौथीच्या गणपतीची स्थापना करण्यात आली.**

# अमोल पाटील महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने सन्मानित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील पेझारी गावचे सुपुत्र अमोल आत्माराम पाटील (बुवा) यांच्या गेल्या ३५ वर्षांपासून भजन क्षेत्रासह ऑर्केस्ट्रा व महफिल क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची तसेच समाजसेवेतील कार्याची दखल घेत बी. द चेंज फाउंडेशन, शिर्डी यांच्या वतीने त्यांना महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. बी. द चेंज फाउंडेशनच्या वतीने २७ सप्टेंबर रोजी शिर्डी येथील साई पालखी निवारा, साईबाबा मंदिर परिसर येथे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला किशोर निर्मळ, डॉ. ज्ञानेश्वर वाकचौरे, उद्योजक बाळकृष्ण एखडे, तेजस्वी मोटे आदी उपस्थित होते.




# जागतिक रेबीज दिनानिमित्त आदर्श शाळा नवघर येथे जनजागृती



**पाली : प्रतिनिधी**

जागतिक रेबीज दिनानिमित्त रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे विद्यार्थ्यांमध्ये रेबीजविषयी शास्त्रीय माहिती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि सुरक्षित वर्तन याबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमासाठी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सुयोग म्हस्कर, पशुवैद्यकीय दवाखाना, पाली यांनी विद्यार्थ्यांना रेबीज आजाराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमादरम्यान पीपीटी सादरीकरण तसेच संबंधित व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवून रेबीजचा प्रसार, लक्षणे, प्रतिबंध व चाव्यानंतर घ्यावयाची काळजी याची माहिती समजावून सांगण्यात आली. प्राण्याने चावा घेतल्यास जखम साबण आणि वाहत्या पाण्याने सलग १५ मिनिटे धुणे हा महत्त्वाचा प्रथमोपचार असून त्यानंतर विलंब न करता वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले.

दरम्यान, सदर कार्यक्रमाच्या यशस्वी अशा उत्तम आयोजनासाठी विषय शिक्षिका वृषाली गुरव, उपशिक्षक राजेंद्र अंबिके, अनुजा माने आणि रुपाली लेंडवे यांनी नियोजन केले. तसेच विद्यार्थ्यांनी पीपीटी, व्हिडीओ आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यामधून रेबीज प्रतिबंधाबाबत महत्त्वपूर्ण शास्त्रीय माहिती आत्मसात केली.

## दुखवटा

### वैशाली कुराडे



**चौक** : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वैशाली सुरेश कुराडे यांचे वयाच्या ७६व्या वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. सामाजिक क्षेत्रात विशेषतः महिलांच्या सक्षमीकरण कार्यात त्यांचा मोठा सहभाग होता. तब्बल ३० वर्षे त्यांनी शासकीय सेवेत प्रामाणिकपणे काम केले. जिल्हा परिषद, अलिबाग येथील बांधकाम विभागात त्यांनी सेवा बजावली. अलिबाग, रोहा आणि माणगाव तालुक्यांमध्ये त्यांनी कर्तव्य पार पाडले. शासकीय नियमानुसार २००७ साली त्या सेवानिवृत्त झाल्या.

# पनवेल मनपातर्फे आरोग्य तपासणी शिबिरे

## विनामूल्य तपासण्या आणि योजनांची नोंदणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबवण्यात येत आहे. महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानांतर्गत नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून विविध तपासण्या व शासकीय योजनांची नोंदणी विनामूल्य उपलब्ध करून दिली जात आहे.




या शिबिरांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, स्तन, गर्भाशय मुख आणि मुख कर्करोग तपासणी, गरोदर महिलांसाठी प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण, रक्त व हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग (टीबी) तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकलसेल व ॲनिमिया तपासणी अशा विविध आरोग्यसेवा दिल्या जात आहेत. तसेच गरोदर व स्तनदा मातांसह लहान बाळांसाठी योग्य आहाराबाबत मार्गदर्शन केले जात आहे. माता व बालसुरक्षा (एमसीपी) कार्ड, प्रधानमंत्री मातृवंदना योजना नोंदणी, आयुष्मान वय वंदना कार्ड वितरण व नोंदणी, 'निक्षय मित्र' स्वयंसेवक नोंदणी आणि अवयवदान नोंदणीही केली जात आहे.

विशेष तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि मार्गदर्शनही उपलब्ध आहे.१७ ते ३० सप्टेंबरदरम्यान नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत पिसार्वे, किरवले बुद्रुक, तळोजे मजकूर, पेंधार, रोहिंजण, पापडीचा पाडा, रोडपाली, कोयनावेळे, पडघे येथील जिल्हा परिषद शाळा, वामनबाबा हायस्कूल, पेठाली अंगणवाडी, संतोष नगर, धरणा गाव, बुद्धविहार सेक्टर १०, तक्का, आसूडगाव अंगणवाडी, दुर्गामाता मंदिर खारघर सेक्टर १२ आदी ठिकाणी शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून १७ ऑक्टोबरपर्यंत उर्वरित ठिकाणीही शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

# शिवकरच्या उपसरपंचपदी रितू पाटील यांची बिनविरोध निवड





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवकर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रितू अक्षय पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्याबद्दल पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील आणि माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन रितू पाटील यांचे अभिनंद करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

यावेळी सरपंच आनंद ढवळे, माजी उपसरपंच रवींद्र ढवळे, मंगेश ढवळे, संतोष मते, प्रांजल पाटील, मोनिका पोपेटा, सदस्या रेश्मा पाटील, सुरेखा टोपले, मनीषा ढवळे, ग्रामपंचायत अधिकारी सचिन पाटील, भरत पाटील, गोटीराम ढवळे, तुकाराम पाटील, वामन ढवळे, माया पाटील, भास्कर पाटील, बबन ढवळे, तुकाराम तुपे, अरविंद माळी, रोशन तुपे, सागर ढवळे, मयूर पाटील, समीर पोपेटा, मंगेश ढवळे, सागर पाटील, रोहित ढवळे, हरिश्चंद्र ढवळे, हरिश्चंद्र घरत, दत्तात्रेय पाटील, तुकाराम पाटील, शालीक पाटील, निलेश महाराज, राम पाटील, चंद्रकांत ढवळे, अरुण पाटील, पुंडलिक ढवळे, सदाशिव पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी नव्या उपसरपंच रितू पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'वीरू'च्या गर्जनेने क्रीडा करंडकाची सुरुवात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय, नवीन पनवेल येथे क्रीडा करंडक २०२६–२७ या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेच्या शुभंकराचे अनावरण बुधवारी (दि. ३०) विद्यालयाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.



'क्रीडा वीर–वीरू' असे या शुभंकराचे नाव असून वाघाच्या रूपातील या शुभंकराचे अनावरण विद्यालयाच्या आजी–माजी विद्यार्थिनी व प्रमुख पाहुण्या वैदेही मोरे आणि धनेशा शिंगोटे यांच्या हस्ते करण्यात आले. वाघ हा शक्ती, शौर्य, आत्मविश्वास आणि चपळतेचे प्रतीक असल्याने क्रीडा स्पर्धेसाठी 'वीरू' या वाघाची शुभंकर म्हणून निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा भावना, जिद्द, आत्मविश्वास, शिस्त आणि संघभावना निर्माण करण्याचा संदेश या शुभंकरातून देण्यात आला. यावेळी विद्यालयातील सर्व विभागांच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रीडा करंडकाचे हे सलग १७वे वर्ष असून महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी संचलित महाराष्ट्रातील विविध विद्यालयांतील मुख्यत्वे इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांकरिता या आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. यावेळी दोन्ही आजी–माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतात विद्यालयाप्रति कृतज्ञता व्यक्त केली. विद्यालयात मिळालेले संस्कार, मूल्यशिक्षण आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा आपल्या आजच्या जीवनात मोठा उपयोग होत असल्याचे त्यांनी सांगितले. उत्साह, क्रीडाभावना आणि विद्यालयाशी असलेली आत्मीयता यांचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या शुभंकर अनावरण सोहळ्याने 'क्रीडा करंडक २०२६–२७' या क्रीडा महोत्सवाची दिमाखदार सुरुवात झाली.

# 'सीकेटी'त आजी-आजोबा दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या वतीने आजी–आजोबा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी सपत्नीक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. हा कार्यक्रम मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.




यावेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी आजी–आजोबा दिनाचे महत्त्व विशद केले. दरम्यान, विशेष संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनाथ आश्रमातील मुलांसाठी अन्नधान्य त्याचबरोबर दैनंदिन वापराच्या वस्तू तसेच कब–बुल बुल युनिटतर्फे ७५ गोष्टींची पुस्तके भेट देण्याचा स्तुत्य उपक्रम राबविला. आजी–आजोबांप्रति आदर व कृतज्ञता व्यक्त करीत त्यांना जुन्या गीतांचा बहारदार नजाराना सादर करीत संगीत शिक्षक रुपेश मढवी यांनी संगीतमय मानवंदना दिली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या पालकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमावेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, त्यांच्या पत्नी वैशाली देशमुख, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य ॲड. राहुल घरत, अभिषेक पटवर्धन, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक कैलास म्हात्रे, मुख्याध्यापिका स्वाती काळे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, हरिश्चंद्र ठाकूर, स्वाती पाटील, नीरजा अधुरी, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, शिक्षक उपस्थित होते.

## निवडक

### मृतदेहाची ओळख पटविण्याचे आवाहन

**पनवेल** : कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाला असून अद्याप त्याची ओळख पटली नाही. मृत व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध घेण्यासाठी कामोठे पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. संबंधित इसमाचे वय ५५ ते ६० वर्षे, रंग सावळा, डोक्याचे केस पांढरे व वाढलेले, उंची सुमारे ५ फूट ६ इंच आणि शरीरयष्टी सडपातळ आहे. मृत्यूसमयी अंगावर कोणतेही कपडे नव्हते. सदर इसमाला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित करण्यात आले. या वर्णनाच्या व्यक्तीबाबत माहिती असल्यास कामोठे पोलीस ठाणे ८६५५३५४११४ किंवा तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक जयेंद्र माने ८१०८८९९५९५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### भांडणादरम्यान महिलेला मारहाण

**पनवेल** : बहिणी व मेहुण्यामध्ये सुरू असलेले भांडण सोडविण्यास गेलेल्या २२ वर्षीय महिलेच्या डोक्यात बिअरची बाटली मारून जखमी केल्याची घटना कृष्णाळे तलाव परिसरात घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रिती पटनी (२२) या बहिणीचे भांडण सोडविण्यास गेल्या असता मेहुणा गणेश चौहान (३०) याने बिअरच्या बाटलीने त्यांच्या डोक्यात मारल्याचे तक्रारीत नमूद आहे. आकाश काळे (२९) याने मारहाण केली. बहीण अंजली चौहान (२८) हिने चावा घेतल्याचेही फिर्यादीने सांगितले. तिन्ही आरोपींना अटक झाली नसून पुढील तपास उपनिरीक्षक सुशांत दृड्डे करीत आहेत.

### विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल** : महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २९ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास फिर्यादी हे अन्न टाकण्यासाठी गेले असता सेक्टर ३५, खारघर तलावाच्या बाजूला बसलेला अनोळखी इसम सिगारेट पीत होता. त्याला सिगारेट पिऊ नको असे सांगितले असता त्याने फिर्यादी आणि त्यांच्या पत्नीसोबत भांडण केले. दगडाने मारहाण करून शिवीगाळ केली तसेच फिर्यादी यांच्या पत्नीचा विनयभंग केला.

### ज्वेलर्स दुकानदाराची फसवणूक

**नवीन पनवेल** : स्कॅनर स्कॅन करून पेमेंट झाले असे सांगून ३४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी २५ ते ३० वर्षीय इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ललित वजन सिंग तवर यांचे जोशी आळी, झवेरी बाजार, पनवेल येथे ओम गणेश ज्वेलर्सचे दुकान आहे. या सोन्याच्या दुकानात जाऊन आरोपीने सोन्याची चेन ९७ हजार रुपयांत खरेदी केली आणि त्यापैकी ६३ हजार रुपये रोख देऊन ३४ हजार रुपये गुगल पेद्वारे करतो, असे सांगून दुकानातील स्कॅनर स्कॅन करून पेमेंट झाले असे फिर्यादींना सांगितले. प्रत्यक्षात पेमेंट न करता त्यांची ३४ हजार रुपयांची फसवणूक केली.

# फुंडे विद्यालयात माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे माहिती अधिकार दिन प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

माहितीचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील नागरिकांच्या सक्षमीकरणाचे प्रभावी साधन असून नागरिकांमध्ये या अधिकाराबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात येतो. यावेळी उरण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक निलेश खाडे यांनी माहिती अधिकाराचे महत्त्व सांगितले.

नागरिकांना शासकीय योजनांची माहिती मिळते, शासनाच्या कामकाजात पारदर्शकता वाढते, नागरिकांना आपल्या हक्कांची जाणीव होते, असे ते म्हणाले. माहिती अधिकार दिनानिमित्त विद्यालयात चित्रकला, निबंध, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत प्रावीण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना निलेश खाडे, पोलीस नाईक दयानंद राठोड, गावीत, पोलीस कॉन्स्टेबल विक्रम बारी, महिला हवालदार कनिष्का नाईक, भोईर, प्राचार्य बी. बी. साळुंखे, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, ज्येष्ठ शिक्षक एस. डी. म्हात्रे, डी. डी. पाटील, आर. जी. शेळके यांनी शैक्षणिक भेटवस्तू देऊन सन्मानित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत विद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील यांनी केले.

# वीर वाजेकर महाविद्यालयाची कोप्रोली आरोग्य केंद्राला अभ्यासभेट



**उरण : प्रतिनिधी**

शैक्षणिक ज्ञान आणि सामाजिक सेवेत दुवा निर्माण करण्याच्या उद्देशाने फुंडे येथील वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या आरोग्य केंद्र समितीने कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांनी ग्रामीण आरोग्य केंद्राच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांनी आरोग्य केंद्रातील डॉक्टर आणि कर्मचारीवर्गाशी संवाद साधला. लसीकरण मोहीम, मातृत्व व बालसंगोपन आणि सर्वसामान्य आजारांवरील उपचार यांसारख्या सेवा कशा दिल्या जातात हे त्यांनी समजून घेतले. अशा प्रकारच्या भेटी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात, असे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी सांगितले. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजते, असेही ते म्हणाले.

या भेटीचे आयोजन डॉ. झेलम झेंडे यांनी केले. त्यांना डॉ. सुजाता पाटील, प्रा. देवेंद्र कांबळे आणि प्रा. विशाखा पाटील यांनी सहकार्य केले. भविष्यात महाविद्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य जागरूकता कार्यक्रम व सामूहिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा मानस आहे.



**पनवेल : महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी नगरसेवक परेश ठाकूर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल झेनिथ इन्फ्राचे प्रोप्रा. महेश पाटील यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

**पनवेल : पंचायत समिती सदस्य योगिता लहाने यांच्या पं.स.निधीतून व संकल्पनेतून कोन आजिवली बौद्धवाडा यांना खुर्ची सेटचे वाटप करण्यात आले. यावेळी भिंगार ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच योगेश लहाने, कोन सरपंच जितेंद्र शिसवे, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष विनेश भागीत, आजीवली माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील तसेच प्रशांत कांबळे (कोन), युवा कार्यकर्ते विनोद खेत्री (शेडुंग) आदी उपस्थित होते.**







**पनवेल : भाजप गव्हाण जिल्हा परिषद कोषाध्यक्ष दीपक गोंधळी यांच्या बामणडोंगरी येथील निवासस्थानी विराजमान गौरा–गणपतीचे माजी उपसरपंच विजय घरत, योगिता भगत, सुहास भगत, अंकुश ठाकूर, रविकांत म्हात्रे, दीपक गोंधळी, शैलेश भगत, सुहास गोंधळी, अभी दापोलकर, आर. सी. पिले, तेजस पेंढारी यांनी दर्शन घेतले.**

संपादकीय

# डिजिटल संरक्षणाची गरज

मुलांचे डिजिटल संरक्षण ही केवळ पालकांची जबाबदारी राहिलेली नाही. संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, सरकार आणि समाजाचीही ती सामूहिक जबाबदारी आहे. या दृष्टिकोनाचा स्वीकार जगभरात होत असून भारतही त्या दिशेने पावले उचलणार आहे.

**गेल्या काही वर्षांत अनेक देशांनी मुलांना सोशल मीडियापासून दूर ठेवण्याच्या दिशेने पावले टाकली आहेत. वर्षभरापूर्वी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांची सोशल मीडिया खाती रोखण्यासाठी संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर कायदेशीर जबाबदारी टाकली. ब्रिटननेही १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया बंदीची घोषणा केली असून लवकरच यासंदर्भातील प्राथमिक नियमांची अंमलबजावणी होईल व येत्या वर्षी ही बंदी पूर्णत्वाने लागू होईल. ब्रिटनने त्याकरिता ऑस्ट्रेलियाने राबवलेला नमुनाच स्वीकारला आहे. स्पेननेही १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया प्रवेशावर निर्बंध आणण्याची दिशा स्वीकारली आहे. अशी पावले उचलणारे देश मुलांच्या वयाची खातरजमा करताना अधिक कठोर स्वरुपाची दक्षता बाळगण्याची जबाबदारी समाज माध्यम मंचांवरच टाकत आहेत. आता भारतही मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आणण्याच्या दिशेने पावले टाकणार आहे. आपल्या देशात अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात उपस्थित केलेला प्रश्न आणि केंद्र सरकारने दाखवलेली तत्परता यामुळे भारताच्या डिजिटल नियमनाच्या पुढील टप्प्याची दिशा निश्चित होऊ शकते. आपल्याला तंत्रज्ञानाला रोखायचे नाही. मात्र बालपण जपत, मुलांचे डिजिटल संरक्षण करत तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर सुनिश्चित करायचा आहे. हीच या चर्चेची खरी कसोटीही ठरणार आहे. सोशल मीडियाने संवाद, शिक्षण आणि माहितीची दारे खुली केली हे खरेच. परंतु तरी त्याची दुसरी बाजू कुणालाच दुर्लक्षित करता येणार नाही. विशेषतः लहान मुलांना ऑनलाइन जगात सायबर-बुलिंग, अनुचित सामग्री, लैंगिक शोषण आणि डेटा गैरवापर यांसारख्या धोक्यांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी केंद्र सरकारला अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबत अधिक प्रभावी वैधानिक चौकट उभी करण्याचा विचार करण्यास सांगितले. सोशल मीडिया कंपन्यांनी भारतीय कायद्यांचे पालन करावे यासाठी वैधानिक प्रयत्न करावेत अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला केली आहे. भारतीय कायद्यानुसार १८ वर्षांखालील व्यक्ती अल्पवयीन मानली जाते. सोशल मीडिया खाते उघडताना प्लॅटफॉर्मच्या अटी, गोपनीयता धोरण आणि सेवा करार स्वीकारावा लागतो. त्यामुळे अल्पवयीन व्यक्तीला अशा करारात्मक संबंधात स्वतंत्रपणे प्रवेश देण्याबाबत कायदेशीर प्रश्न उपस्थित होतो. याच मुद्यावर 'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स'ने याचिका दाखल केली आहे. त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित विद्यमान नियमांमध्ये आवश्यक तरतुदी करण्याचा विचार करण्यास सांगितले. विशेष म्हणजे न्यायालयाने ही बाब केवळ मार्गदर्शक तत्त्वांपुरती मर्यादित न ठेवता वैधानिक स्वरूपात आणण्याची शक्यता तपासण्यास सांगितले. केंद्राच्या वतीने महाधिवक्ता तुषार मेहता यांनीही या विषयावर आवश्यक पावले उचलण्याची तयारी दर्शवली आहे. हे करताना मुलांचे संरक्षण आणि डिजिटल स्वातंत्र्य यांच्यातील महत्त्वाचे संतुलन बाळगावे लागणार आहे. शैक्षणिक संकेतस्थळे, ऑनलाइन शिक्षण किंवा आवश्यक डिजिटल सेवा यांना अनावश्यक अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पालकांच्या संमतीसारख्या तरतुदींचाही विचार करावा लागेल. संबंधित कायद्यात मुलांच्या वैयक्तिक माहितीच्या प्रक्रियेसाठी पालकांच्या पडताळणीयोग्य संमतीची तरतूद आहे. मुलांना डिजिटल जगातील धोक्यांपासून वाचवण्यासाठी ठोस नियमांची आवश्यकता आहे आणि सरकार त्यासंदर्भात गांभीर्याने विचार करत आहे.**

# मानवतावादी भावनेतून स्वैच्छिक रक्तदान...



१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर "स्वस्थ नारी निरोगी परिवार' या अभियान अंतर्गत 'सेवा पंधरवडा' म्हणून आरोग्याच्या दृष्टीने केंद्र सरकार तसेच राज्य सरकार मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री,यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्वत्र राबविण्यात येत आहे. "सेवा पंधरवडा" हा राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाच्या औचित्य साधून राबविण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या सेवाभाव तत्त्वज्ञानाचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाभिमुख विचारांचा हा संगम साधणारा उपक्रम असून महाराष्ट्र शासन-प्रशासनाला लोकाभिमुख, कार्यक्षम आणि अधिक पारदर्शक करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे .

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या 'सेवा पंधरवडा' निमित्त देशभरात तसेच महाराष्ट्रात स्वैच्छिक रक्तदान जनजागृती व रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. सेवा पंधरवडा व राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवसानिमित्त स्वैच्छिक रक्तदान मोहिमेला युवकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे तसेच १ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस म्हणून पाळला जात असून या दिवसाच्या निमित्ताने स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत.

स्वैच्छिक रक्तदान शिबिरांत रक्तदात्यांनी 'रक्तदान जीवनदान' या मानवतावादी भावनेतून नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसारराष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नँको, म. रा. एड्स नियंत्रण सो., रक्तसुरक्षा विभाग, राज्य रक्त संक्रमण परिषद तसेच संबंधित आरोग्य यंत्रणांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा उपक्रम देशभरात आणि महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे. तसेच प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली स्वैच्छिक रक्तदान मोहिमेत युवा वर्गाचा सक्रिय सहभाग वाढविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. युवकांमध्ये रक्तदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, रक्तदानाचे महत्त्व समजावून सांगणे आणि नियमित स्वैच्छिक रक्तदानासाठी युवकांना प्रोत्साहित करणे हा या मोहिमेचा महत्त्वाचा उद्देश आहे.

शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार

रक्तदाता म्हणून १ ऑक्टोबर २०२६, राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिनानिमित्त नियमितपणे रक्तदान करण्याची प्रतिज्ञा करीत आहे...

रक्तदाता...रक्तदान प्रतिज्ञा...

भारतातील रक्ताची गरज लक्षात घेऊन, माझ्या कुटुंबातील सदस्य, मित्र, नातेवाईक, सहकारी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये नियमित, स्वैच्छिक व विनामोबदला रक्तदानाच्या गरजेबाबत जनजागृती करण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे तसेच जेव्हा कोणत्याही व्यक्तीस रक्ताची गरज असेल, तेव्हा कोणत्याही प्रकारच्या स्वार्थाशिवाय आणि कोणताही भेदभाव न करता रक्तदान करण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे.रक्ताच्या कमतरतेमुळे आपल्या आजूबाजूला कोणाचाही जीव जाऊ नये, यासाठी मी सातत्याने प्रयत्न करीन.

२०२६चे अभियान घोषवाक्य

"मानवतेचा एक थेंब. रक्तदान करा. जीवन वाचवा."

स्वैच्छिक रक्तदान...वाचवी रुग्णांचे प्राण

युवाशक्ती ही राष्ट्रशक्ति असल्याने युवा वर्गाने या मोहिमेत सहभागी होऊन रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी पुढाकार महत्त्वाचा आहे.

रक्तदानाने थँलेसेमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, ल्युकेमिया इ. अशा रुग्णांना नेहमी रक्ताची गरज भासते.

अतिदक्षता, प्रसुती, अपघात, रक्तक्षय, अतिरक्तस्राव, थँलेसेमिया, सिकलसेल इ. आदी अशा रुग्णांना जीव वाचवण्यासाठी तातडीने रक्ताची आवश्यकता असते.

नेहमी शासन मान्यता प्राप्त रक्तपेढीत/रक्तकेंद्रात अथवा आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करणार.. हा माझा संकल्प.

रक्तदान केल्यानंतर रक्त नैसर्गिकरित्या भरून निघते तसेच नवीन पेशी तयार होण्यासाठी नवचेतना निर्माण होते.

रक्तदान प्रक्रियेत रक्तदानाची सुरक्षितता याचे काटेकोरपणे पालन केले जाते.

समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निःस्वार्थीपणे,समाजहितासाठी, राष्ट्रसेवा म्हणून रक्तदान महत्त्वाचे.

स्वैच्छिक रक्तदाता म्हणून व्हाट्सएप ग्रुप,सोशल मीडिया,डिजिटल माध्यमातून रक्तदान शिबिर तसेच रक्तदाता नोंदणी संपर्क अभियान राबवून रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी मदत होऊ शकते.

शासनाकडून मार्गदर्शक सुचनेनूसार रक्तदानानंतर रक्तदात्यांना "रक्तदान कार्ड" दिले जाते त्यावर एक रक्तपिशवी मोफत मिळते, पण याची मुदत दोन वर्षे असते.

राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान अभियान आरोग्य सेतू पोर्टलवर https://eraktkosh.mohfw.gov.in/ या वेबसाईटवर रजिस्टर नोंदणी करून स्वैच्छिक रक्तदान करुन रक्तदानाबद्दल ऑनलाईन रक्तदान प्रमाण पत्र देता येते.

जीवन वाचविण्यासाठी अमूल्य योगदान देणाऱ्या स्वैच्छिक रक्तदात्यांचा सन्मान व गौरव करणे तसेच नियमित स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करणे हा या दिनाच्या आयोजनाचा प्रमुख उद्देश आहे.

गरजू रुग्णांना वेळेवर सुरक्षित रक्त उपलब्ध व्हावे यासाठी नियमित व स्वैच्छिक रक्तदानाची चळवळ अधिक व्यापक होणे आवश्यक आहे.

स्वैच्छिक रक्तदान शिबिरांत रक्तदात्यांनी 'रक्तदानजीवनदान' या मानवतावादी भावनेतून नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

१ ऑक्टोबर राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवसाच्या निमित्ताने युवकांनी मोठ्या संख्येने पुढाकार घेऊन स्वैच्छिक रक्तदान करुन आणि आपल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

" रक्तदान करारक्ताची गरज असलेल्या रुग्णांसाठी आशेचा किरण बना! "

**-हेमकांत सोनार,** (प्र.शा.तं.रक्त सुरक्षा), जिल्हा सामान्य रुग्णालय, रक्तकेंद्र, अलिबाग-रायगड

# आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन

दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिन आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ दिन म्हणून साजरा केला जातो. खरंतर ज्येष्ठांचा सन्मान दररोज, प्रत्येक क्षण आपल्या मनात असावा, परंतु त्यांच्या प्रती आपल्या मनात असलेल्या आदराला व्यक्त करण्यासाठी आणि वडीलधाऱ्यांना प्रतिबिंबित करण्यासाठी, औपचारिकरीत्या एक दिवस निश्चित केला गेला आहे.

आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करण्याची सुरुवात १९९०मध्ये केली गेली. जगात वृद्धांवर होणारे गैरवर्तन आणि अन्यायाला रोखण्यासाठी आणि लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी १४ डिसेंबर १९९० रोजी हा निर्णय घेण्यात आला की दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जाणार आणि १ ऑक्टोबर १९९१ रोजी प्रथमच आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला गेला.

या अगोदरदेखील वृद्धांसाठी काळजी करत त्यांच्यासाठी पुढाकार घेण्यात आला होता. वर्ष १९८२मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने 'वृद्धावस्था आनंदी करा'चा नारा देऊन 'सर्वांसाठी आरोग्य मोहीम सुरु केली. यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाने १९९१मध्ये आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ दिनाचा आरंभ केला. नंतर १९९९मध्ये आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक वर्षाच्या रूपात साजरे केले जाते. हा दिवस संपूर्णपणे ज्येष्ठांना समर्पित करण्यात आला आहे. वृद्धाश्रमात त्यांच्यासाठी बऱ्याच प्रकाराचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यांचा आनंदाची आणि आदराची काळजी घेतली जाते. विशेषतः त्यांचा सोयीचा आणि समस्यांचा विचार केला जातो, आणि त्यांचा आरोग्याकडे गंभीरतेने जातीने लक्ष दिले जाते.

प्रत्येक नागरिकाचे हे कर्तव्य आहे की ापल्या घराच्या वडिलधाऱ्यांची आणि ज्येष्ठांची काळजी घ्यावी आणि त्याचा सांभाळ चांगल्या प्रकारे करावा. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# दीर्घ प्रतीक्षेनंतर भारतात अखेर 'ॲपल पे' लॉन्च

स्मार्टफोन जगतातील दिग्गज कंपनी Appleने अखेर भारतात आपली बहुप्रतिक्षित Apple Pay डिजिटल पेमेंट सेवा लॉन्च केली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चा आणि अंदाजांना पूर्णविराम देत कंपनीने बुधवारी देशात आपली Tap-to-Pay सेवा अधिकृतपणे सुरू केली. विशेष म्हणजे, अमेरिकेत सप्टेंबर २०१४मध्ये ही सेवा प्रथम लॉन्च करण्यात आली होती, म्हणजेच तब्बल १२ वर्षांनंतर हे सेवा भारतात लॉन्च झाली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार भारतामध्ये Apple Payची सुरुवात सध्या Axis Bankच्या सहकार्याने करण्यात आली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात Axis Bankकडून जारी करण्यात आलेली Visa आणि Mastercard क्रेडिट कार्ड्स Apple Payमध्ये जोडता येणार आहेत.

Apple Payच्या माध्यमातून ग्राहकांना दुकानांमध्ये कार्ड किंवा रोख रक्कम न काढता थेट Apple डिव्हाइसद्वारे पेमेंट करता येणार आहे. सध्या ही सुविधा iPhone, iPad आणि Apple Watch या डिव्हाइसवर उपलब्ध आहे. भविष्यात Mac डिव्हाइससाठीही उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

फिजिकल स्टोअरमध्ये Apple Payद्वारे पेमेंट करण्यासाठी संबंधित दुकानाच्या PoS मशीनमध्ये NFC किंवा Tap-to-Pay सुविधा असणे आवश्यक आहे. अशा PoS मशीनजवळ Apple डिव्हाइस नेल्यास पेमेंट प्रक्रिया पूर्ण करता येते.

Apple Payची पेमेंट प्रक्रिया तुलनेने सोपी आहे. NFC-सक्षम PoS मशीनजवळ iPhone किंवा Apple Watch नेल्यावर पेमेंट करता येते. कंपनीच्या माहितीनुसार, व्यवहाराच्या वेळी प्रत्येक वेळी कार्डचा PIN किंवा OTP स्वतंत्रपणे टाकण्याची आवश्यकता नसते. पेमेंटची सुरक्षा मात्र Appleच्या डिव्हाइस सिक्युरिटी सिस्टमद्वारे केली जाते. त्यामुळे केवळ डिव्हाइस PoS मशीनजवळ नेल्याने कार्डची खासगी माहिती दुकानदाराला उपलब्ध होत नाही.

भारतामध्ये Apple Payची सुरुवात सध्या Axis Bankच्या Visa आणि Mastercard क्रेडिट कार्ड्सपासून झाली आहे. आगामी काळात आणखी बँका, कार्ड नेटवर्क आणि डिव्हाइस Apple Payच्या भारतातील सेवेशी जोडले जाण्याची शक्यता आहे.

# थोर साहित्यिक ग. दि. माडगूळकर



निमित्त

गजानन दिगंबर माडगूळकर म्हणजेच आपले सर्वांचे ओळखीचे गदिमा. त्यांचा जन्म सांगली शेटफळे येथे १ ऑक्टोबर १९९९ रोजी झाला. यांच्या वडिलांचे नाव दिगंबर बळवंत माडगूळकर आणि आईचे नाव बनुताई दिगंबर माडगूळकर होते.

'गदिमां'चे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. त्यांच्या घराची परिस्थिती बेताची होती. त्यामुळे त्यांना चरितार्थासाठी चित्रपट व्यवसायात यावे लागले. त्यांच्या नक्कल करण्याच्या आणि लिखाणाच्या आवडीमुळे त्या कलेचा येथे चांगलाच उपयोग झाला.

हंस पिक्चर्स चित्र संस्थेच्या 'ब्रह्मचारी' (१९३८)मध्ये गदिमा यांनी छोटी भूमिका साकारून आपल्या चित्रपटातील कारकीर्दीचा शुभारंभ केला. लेखनिक म्हणूनही त्यांनी कार्य केले. सुप्रसिद्ध साहित्यकार वि.स. खांडेकरांचे ते लेखनिक होते. त्यांच्याच पुस्तक संग्रहालयात त्यांना अनेक पुस्तके वाचायला मिळाली. त्यामुळे लिखाणाला वेग आला. नवयुग चित्रसंस्थेत के. नारायण काळे यांच्या हाताखाली सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केले.

आचार्य अत्रे यांचा प्रासादिक गीतरचनेचा आदर्श त्यांच्यासमोर होता. गदिमांनी भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटाची गीते लिहिली. त्यांना लोकशाहीर रामजोशी चित्रपटात कथा संवाद आणि गीते लिहिण्याची तसेच एक छोटी भूमिका करण्याची संधी मिळाल्याने त्यांनी चित्रपटसृष्टीत आपला ठसा उमटवला आणि ते मराठी सिनेसृष्टीचा भक्कम आधार बनले.

कवी आणि लेखकाच्या नात्याने गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्यासारख्या संतांचे सखोल संस्कार झाले होते. त्यांच्या कवितेवर मराठमोळेपणाचे संस्कार दिसतात. गदिमा आधुनिक काळातील मराठी भाषेतील अग्रगण्य साहित्यिक होते.

अनेक समरगीते, बालगीते त्यांनी लिहिली. त्यांनी लिहिलेल्या गीत रामायणाने तर मराठमोळ्या प्रेक्षकांना अक्षरश: वेडच लावले. सर्वत्र त्यांची किर्ती पसरली. ते भावकवीसुद्धा होते. त्यांचा काव्यावर संत काव्य आणि शाहिरी अशा दोन्ही काव्यांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी अनेक लावण्या आणि चित्रपटगीते लिहिली आहेत, जी आजही प्रसिद्ध आहेत. त्यांच्या गीतरामायणाच्या गायनाचे शेकडो कार्यक्रम झाले व अजूनही अनेक कलाकार सादर करीत असतात. विशेष म्हणजे अनेक भारतीय भाषांमध्ये त्याचे अनुवाद केले गेले.

'गदिमां'चे काही गाजलेले चित्रपट म्हणजे पुढचं पाऊल, बाळा जो जो रे, लाखाची गोष्ट, जगाच्या पाठीवर, संथ वाहते कृष्णामाई, मराठी चित्रपट तसेच तुफान और दिया, दो आँखे बारह हाथ, गुंज उठी शहनाई अशा हिंदी चित्रपटांतही त्यांनी लिखाण केले आहे.

भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार देऊन गदिमांचा सन्मान केला. १९७३ साली त्यांना मराठी साहित्य संमेलन यवतमाळचे अध्यक्षपद देण्यात आले. महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ सदस्य संगीत नाटक अकादमी व विष्णूदास भावे सुवर्णपदक पुरस्कारानेही ते सन्मानित झाले. १४ डिसेंबर १९७७ रोजी पुणे येथे गदिमांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# ग्लासभर बडीशेपचं पाणी देते शरीराला नवी एनर्जी

जेवणानंतर बडीशेप खाण्याची सवय अनेकांना असते. काही जण त्याला व्यसनच समजतात, तर काही म्हणतात रोज कशाला खायची? खरेतर रोज जेवणानंतर साधी बडीशेप खाणे आरोग्यासाठी चांगले ठरते. बडीशेप ही आपल्या स्वयंपाकघरात सहज मिळणारी असली तरी ती अत्यंत उपयुक्त आहे. तिच्या सुगंधामुळे आणि गोडसर चवीमुळे ती विविध मसाल्यांमध्ये वापरली जाते, शिवाय तिचे औषधी गुणधर्मही तितकेच महत्त्वाचे आहेत.



बडीशेपेत कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, झिंक, जीवनसत्त्व ए असते. एवढेच नाही तर जीवनसत्त्व सी आणि बी सारखी इतरही अनेक जीवनसत्वे असतात. याशिवाय त्यात फायबर, प्रथिने आणि आवश्यक अँटी ऑक्सिडंट्सही असतात, जे शरीराच्या मजबूतीसाठी उपयुक्त ठरतात. बडीशेप भाजून खा तसचे जेवणात वापरा, पण बडीशेपेचे पाणी पिणे हा एक साधा आणि परिणामकारक उपाय आहे. हे पाणी अनेक आरोग्य समस्यांवर नैसर्गिक औषधासारखे कार्य करते.

बडीशेपेचे पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. पचायला जरा जड असलेले अन्न खाल्ल्यानंतर पोटात होणारे गॅस किंवा अपचन कमी करण्यासाठी हे पाणी उपयुक्त ठरते. शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यासाठी ते मदत करते आणि त्यामुळे त्वचेचा निखार वाढतो. यामध्ये असलेले अँटी ऑक्सिडंट्स शरीरातील पेशींचे संरक्षण करतात. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात. बडीशेप थंड प्रवृत्तीची असल्यामुळे तिचे पाणी पोटाला आणि शरीराला गारवा देऊन उष्माघातापासून संरक्षण करते. महिलांसाठी हे विशेष फायदेशीर मानले जाते कारण मासिक पाळीतील वेदना कमी करण्यात आणि हार्मोन्स संतुलित ठेवण्यात त्याचा उपयोग होतो. तसेच लोह आणि इतर खनिजांमुळे रक्तवाढीस मदत होते.

नियमित बडीशेपेचे पाणी प्यायल्याने वजन कमी करण्यात मदत होते. कारण ते भूक नियंत्रित ठेवते आणि मेटाबॉलिझम वाढवते. याशिवाय रक्तदाब संतुलित ठेवण्यात आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यातही त्याचा उपयोग होतो. डोळ्यांच्या आरोग्यासाठी जीवनसत्त्व ए उपयुक्त असून ते दृष्टीसाठी चांगले ठरते. इतक्या विविध पोषक गुणधर्मांमुळे बडीशेपेचे पाणी हे नैसर्गिक टॉनिक मानले जाते. रोज सकाळी किंवा रात्री झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात भिजवून ठेवायचे. काही तासांनी बडीशेपेचे पाणी प्यायचे. ज्यांना पित्ताचा त्रास होतो त्यांनी तर दिवसातून दोनदा असे पाणी प्यायले तरी चालेल.

# लोणेरेत रोजगार महाकुंभ उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

युवक-युवतींच्या कौशल्याला रोजगाराची जोड देण्यासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ-महाराष्ट्र' अंतर्गत रायगड जिल्ह्यातील रोजगार मेळावा डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

रोजगार महाकुंभाच्या उद्घाटन सोहळ्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. यावेळी कौशल्य विकास मंत्री अॅड. मंगल प्रभात लोढा तसेच उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. उद्योगविश्व आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींमध्ये थेट संवाद घडवून आणणे तसेच उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य व क्षमतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या मेळाव्यात ३६४हून अधिक युवक-युवतींनी नोंदणी करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



औद्योगिक, उत्पादन, फार्मास्युटिकल, ऊर्जा, ऑटोमोबाईल, हॉस्पिटॅलिटी आदी विविध क्षेत्रांतील २२हून अधिक कंपन्या व आस्थापनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. उमेदवारांना कंपनीच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधण्याची, मुलाखती देण्याची तसेच त्यांच्या पात्रतेनुसार उपलब्ध रोजगाराच्या संधी जाणून घेण्याची संधी मिळाली. १००हून अधिक उमेदवारांची रोजगारासाठी प्राथमिक निवड झाल्याची माहिती देण्यात आली.

## वृद्धाश्रमास आर्थिक मदत

**रेवदंडा** : चौल येथील श्री सद्गुरू ग्रामीण पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत लिलाश्री सहजीवन वृद्धाश्रमास १२ हजार रुपयांचा मदत निधी सुपूर्द केला. पतसंस्थेचे सचिन असिफ किरकिरे, संचालक प्रथमेश राऊत व इतर पदाधिकाऱ्यांनी वृद्धाश्रमास प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थापक प्रमोद हर्डिकर यांच्याकडे १२ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

## भगवान धुळे यांना पुरस्कार



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष भगवान दामू धुळे यांना इंडिया-२४च्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रातील महाराष्ट्र उत्कृष्ट पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कोल्हापूर येथील शाहू स्मारक भवनात पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अभिनेत्री पौर्णिमा डे यांच्या हस्ते धुळे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. धुळे हे गेली नऊ वर्ष कुस्तीगीर संघामध्ये काम करत आहेत. ते मार्शल आर्ट कराटेमध्येही सेकंड रँक ब्लॅक बेल्ट आहेत. पुरस्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## माथेरान क्षत्रिय मराठा समाजाची नवी कार्यकारिणी जाहीर

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान येथील क्षत्रिय मराठा समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा मराठा भवन येथे पार पडली. मावळते अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत समाजाच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली तसेच पुढील तीन वर्षांसाठी नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

यामध्ये अध्यक्षपदी गिरीष पवार, उपाध्यक्षपदी अनंत शेलार व आदित्य भिल्लारे, सचिवपदी योगेश जाधव, सहसचिवपदी मंगेश मोरे, खजिनदारपदी संतोष शिदे आणि सहखजिनदारपदी विजय कदम यांची निवड करण्यात आली.

यावेळी माथेरान नगर परिषदेवर निवडून आलेल्या समाजातील नगरसेवक आणि नगरसेविकांचा तसेच वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या युवक-युवतींचा गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## जनार्दन वडेकर यांना सेवानिरोप

**माणगाव : प्रतिनिधी**

खरवली विभाग शिक्षण प्रसारक मंडळ संचालित नूतन माध्यमिक विद्यालय, खरवली येथील क्रीडा शिक्षक जनार्दन काशीराम वडेकर हे आपल्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यानिमित्त निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अॅड. महेंद्र मानकर, उपाध्यक्ष अॅड. सुशील दसवते, खजिनदार प्रसाद आंबुर्ले, कार्यवाह सखाराम जाधव, रमेश मोरे, सदस्य गणपत महाडिक, नितीन खडतर, माजी सरपंच महादेव खडतर , मुख्याध्यापक नंदकिशोर ढाकणे यांच्यासह ग्रामस्थ, आजी-माजी विद्यार्थी, नातेवाईक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेच्या वतीने अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री. वडेकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विद्यालयाच्या वतीनेही त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर, संस्था पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी, सहकारी शिक्षक आणि कुटुंबीयांनी श्री. वडेकर यांच्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा, क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका नीता करकरे व शिक्षक महेंद्र जंगम यांनी केले.




### पनवेल महानगरपालिका, पनवेल
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं ४१०२०६

**जाहिर सुचना**

विद्युत विभाग

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता संबंधीत Manufacturer/ Dealer/Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात येत आहे. सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र. ३१६/३३८/२०२६
दिनांक-३०/०९/२०२६

सही/-
**विद्युत विभाग प्रमुख**
**पनवेल महानगरपालिका**



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. नाना मंगळु पाटील व इतर** यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. नाना मंगळु पाटील व इतर** तसेच आमचे अशिल यांनी संमती दर्शवली आहे व या दोघांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन-: मौजे कळबुंसरे (५५३३३४)**
**PU-ID: १७९०३२१२१२५, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १०८/३ खाते क्रमांक १६८ | १ | ०.३८.३० पो.ख ०.०३.८० **एकूण क्षेत्र ०.४२.१०** | ७.५६ |

एकूण क्षेत्र ०.४२.१० गुंठे पैकी ०.३०.०० गुंठे

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांचे** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१ ऑक्टोबर २०२६

सही
**अॅड. निलेश झंजाड**
बी १०४ सफायर सी.एच.एस.लि., सेक्टर २२, भूखंड क्रमांक ३३/३४, कामोठे - ता. पनवेल, जि. रायगड.
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१



### जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसद्वारे लोकांना कळविण्यात येते की, मौजे वळक, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत श्री प्रभाकर आंब्या पाटील व इतर यांच्या मालकीची आहे.

| अनु क्रं. | मौजे | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | वळक | ९९ | ०-५९-२० १-११-३० पो.ख. ०-११-९० एकुण १-८२-४० पैकी ०-४०-०० | १७.१९ |
| २ | वळक | १०० | ०-१०-०० पो.ख. ०-०१-०० एकुण ०-११-०० | ०.२० |

वर नमूद मिळकती या सदर मालकांनी विकण्याचे ठरविले असुन सदरची मिळकत आमच्या अशिलांनी कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दान, गहाण, पोटगी, लिज भाडेकरू, हक्क, मालकी हक्क व इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यासह लेखी हरकत नोंदवाव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकती बाबत खरेदी खताचा / लिजचा व्यवहार पुरा केला जाईल याची नोंद घ्यावी.

सही /-
**तृप्ती महेंद्र म्हात्रे**
**अॅडव्होकेट,**
९, दुसरा मजला, सुयोग सि.एच.एस., सातरहाटी उरण, ता. उरण.
फोन नं. ८८७९१४१२३२



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्रीमती. वैशाली विद्याधर एकबोटे, श्री. प्रंशात कृष्णा गुरव व इतर** यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्रीमती. वैशाली विद्याधर एकबोटे, श्री. प्रंशात कृष्णा गुरव व इतर** तसेच आमचे अशिल यांनी संमती दर्शवली आहे व या दोघांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन-: मौजे बोरी बुद्रक (५५३३२७)**
**PU-ID: १९७९९५६५१७६, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २२/३ खाते क्रमांक ४०४ | १ | ०.२७.१० पो.ख ०.०३.०० **एकूण क्षेत्र ०.३०.१०** | २.४४ |

एकूण क्षेत्र ०.३०.१० गुंठे

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांचे**आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१ ऑक्टोबर २०२६

सही
**अॅड. निलेश झंजाड**
बी १०४ सफायर सी.एच.एस.लि., सेक्टर २२, भूखंड क्रमांक ३३/३४, कामोठे - ता. पनवेल, जि. रायगड.
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१



### जाहीर सूचना

म्हसळा नगरपंचायत क्षेत्रातील सर्व शासकीय, निमशासकीय, शैक्षणिक संस्था, गृहनिर्माण संकुले, व्यावसायिक आस्थापना, हॉटेल्स, हॉस्पिटल्स, मॉल्स तसेच मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या इतर सर्व संस्थांना कळविण्यात येते की, भारत सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ नुसार काही विशिष्ट निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांनी Bulk Waste Generator (BWG) म्हणून नोंदणी करणे आवश्यक आहे.

- खालीलपैकी कोणतीही एक अट लागू असल्यास BWG नोंदणी बंधनकारक आहे :
- संस्थेचे एकूण बांधकाम क्षेत्र २०,००० चौरस मीटर किंवा त्याहून अधिक असेल.
- दररोजचा पाणी वापर ४०,००० लिटर किंवा त्याहून अधिक असेल.
- दररोज १०० किलो किंवा त्याहून अधिक घनकचरा निर्माण होत असेल.

अशा सर्व पात्र संस्थांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) यांच्या ऑनलाइन SWM पोर्टलवर त्वरित नोंदणी करावी. तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ नुसार ओला कचरा, सुका कचरा, सॅनिटरी कचरा व घातक कचरा अशा चार प्रकारांमध्ये स्त्रोत पातळीवर वर्गीकरण (४-Stream Segregation) करणे बंधनकारक आहे. नियमांनुसार नोंदणी न करणाऱ्या किंवा कचरा व्यवस्थापनाच्या तरतुदींचे पालन न करणाऱ्या संस्थांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी म्हसळा नगरपंचायत, स्वच्छता विभागाशी संपर्क साधावा.

**जा क्र. १२२८ म्हनप/२०२६-२७**
**म्हसळा नगरपंचायत कार्यालय, म्हसळा,**
**जिल्हा - रायगड,**
**दिनांक: ३०/०९/२०२६**

सही/-
**मुख्याधिकारी**
**म्हसळा नगर पंचायत**



### जाहीर नोटीस

यादवारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आलेल्या शासकीय भूखंडचे वारस नोंद करणेबाबत या करिता श्रीम. शितल प्रफुल्ल घाटोळे यांनी या कार्यालयात दि. २४/०३/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

**भूखंडाचा तपशील**

| गावाचे नांव व तालुका | भूखंड क्रमांक | सिटी एस क्रमांक | क्षेत्र | सध्याचे पट्टेदाराचे नाव | मुदत संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| मौजे माथेरान, ता. कर्जत | माथेरान बाजार भूखंड क्रमांक बी. पी.५१ | ३२२ | १२१.९० चौ. मी. | श्रीम. शांताबाई दत्तात्रेय कांबळे | ३१/०७/१९८६ |

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, वरील भूखंडाबाबत वारसनोंद नुतनीकरण /हस्तांतरण/भोगवटादार वर्ग १ इ. बाबत कोणाचीही हरकत असल्यास, सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा दिवसांत अशी हरकत अधीक्षक माथेरान, ता. कर्जत, जि. रायगड याजकडे आवश्यक कागदपत्रे/पुरावे यासह लेखी स्वरूपात सादर करणेत यावी. मुदतीत आलेल्या हरकती विचारात घेणेत येतील, याची नोंद घ्यावी.

सही/-
**अॅड.सुरेन्द्र ठाकूर**
अधीशक माथेरान



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **श्री. महेश रामचंद्र साळुंके व श्री. सतीश रामचंद्र साळुंके** यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. महेश रामचंद्र साळुंके व श्री. सतीश रामचंद्र साळुंके** तसेच आमचे अशिल यांनी संमती दर्शवली आहे व या दोघांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन-: मौजे विंधणे (५५३३२४)**
**PU-ID: ३३२७७८१५०११, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १६१/२ खाते क्रमांक १००८७ | १ | ०.६४.५० पो.ख ०.१२.०० **एकूण क्षेत्र ०.७६.५०** | ५.८७ |

एकूण क्षेत्र ०.७६.५० गुंठे

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपतत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती नसल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०१ ऑक्टोबर २०२६

सही
**अॅड. निलेश झंजाड**
बी १०४ सफायर सी.एच.एस.लि., सेक्टर २२, भूखंड क्रमांक ३३/३४, कामोठे - ता. पनवेल, जि. रायगड.
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१



### Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel

**Plot No.4, Sector-11, Khanda Colony,**
**New Panvel (W), Tal.: Panvel, Dist.: Raigad, Pin-410206**

**Applications are invited for Administrative Assistants**

| Nature of Post | No. of Posts |
|---|---|
| **Administrative Assistant** | **02** |
| Educational Qualification | Post Graduate (Preferably MBA) (Any Stream) |
| Experience | Atleast 05 (Five) Years experience at Administrative Office either in Corporate or in Higher Educational Institutions |

**Hard Skills**
- Data Entry and Management
- Advanced Proficiency in Microsoft Office Suit
- Basic Accounting and Bookkeeping
- Typing Speed and Accuracy (English and Marathi)
- Database Administration
- Document Management and Filing Systems
- Information Technology (IT) Skills
- Customer Relationship Management
- Business Correspondence
- Time Management and Scheduling

**Soft Skills**
- Effective Communication and Active Listening
- Time Management and Prioritization
- Adaptability and Flexibility
- Problem-Solving and Critical Thinking
- Attention to Detail and Accuracy
- Customer Service and Client Relations
- Teamwork and Collaboration
- Organizational and Filing Skills
- Confidentiality and Discretion
- Stress Management and Resilience

Applications with full details (Email address and WhatsApp number) should reach with the attested photocopy of certificates to **The Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, 6th Floor, Plot No. 4, Sector 11, Khanda Colony, New Panvel (W), Tal.: Panvel, Dist.: Raigad, Pin-410206.** Candidates may submit application by email to **jbsp123_sanstha@yahoo.in** on or before 16/10/2026. In case of any query contact -
**Mrs. Suvarna Chaudhari - 9222161835**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel



### Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha,Panvel

**Plot No.4, Sector-11, Khanda Colony,**
**New Panvel (W), Tal.: Panvel, Dist.: Raigad, Pin-410206**

**Applications are invited for I.T. Coordinator**

| Nature of Post | No. of Posts |
|---|---|
| **IT Coordinator** | **02** |
| Educational Qualification | Graduate or Post Graduate in Computer Science / I.T. / Computer Applications/ IT Management / Information System) With additional knowledge of I.T. hardware is preferred |
| Experience | 5+ Years in IT Management or leadership role |

**Key Responsibilities**
- **Troubleshooting** - Diagnosing and resolving hardware, software, and network issues for users
- **Installation and Configuration** - Setting up new computers, software, and peripherals, ensuring proper functionality and compliance with security policies
- **System Maintenance** - Performing routine maintenance tasks like updates, patches, and backups to ensure systems are running smoothly and securely
- **User Support** - Providing technical support to users, either in person, over the phone, or through online channels
- **Hardware and Software Management** - Managing inventory of IT assets, including hardware and software, and ensuring proper documentation
- **Security** - Implementing and maintaining security protocols, such as firewalls and antivirus software, to protect institute data and systems
- **Training** - Providing training to users on new software or hardware
- **Documentation**- Creating and maintaining documentation for IT systems and procedures
- **Scope** - Complete IT infrastructure, Computer and Accessories, ICT equipments, Smart Boards, Projectors, Screens, CCTV Cameras, Online Meetings, VC, etc.

**Skills and Qualifications**
- **Technical Skills** - Strong knowledge of computer hardware, software, operating systems (Windows, macOS), and networking concepts
- **Problem-Solving** - Ability to analyse issues, identify root causes, and implement effective solutions
- **Communication Skills** -Ability to communicate technical information clearly and concisely to users of all technical levels / management
- **Service Skills** - Excellent service skills to provide helpful and patient support to users
- **Organizational Skills** - Ability to prioritize tasks, manage time effectively, and maintain accurate records

Applications with full details (Email address and WhatsApp number) should reach with the attested photocopies of certificates to **The Principal, Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel, (Empowered Autonomous) Plot No.1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Tal.: Panvel, Dist.: Raigad, Pin-410206.** Candidates may submit application by email to **principal@ckthakurcollege.net** on or before 16/10/2026. In case of any query contact **Mr. P. N. Thakur-90226 00288**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha Panvel

# २६ कोटींचे अमली पदार्थ नष्ट

## नशामुक्त नवी मुंबई अभियानांतर्गत कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

२०१ गुन्ह्यांमध्ये जप्त केलेले ७२६ किलो वजनाचे २६ कोटी ३० लाख रुपये किमतीचे अमली पदार्थ तळोजा येथील मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनीत बुधवारी नष्ट करण्यात आले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत नियमानुसार या अमली पदार्थांची विल्हेवाट लावण्यात आली. यावेळी सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे, पोलीस उपायुक्त अमित काळे, डॉ. रश्मी नांदेडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, प्रवीण भगत व इतर अधिकारी उपस्थित होते.



पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या नेतृत्वाखाली तीन वर्षे नऊ महिन्यांच्या कारकिर्दीत आतापर्यंत ३९३ गुन्ह्यांमधील १३९ कोटी ७४ लाख रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. नवी मुंबई पोलिसांची ही आजपर्यंतची सर्वाधिक उल्लेखनीय कारवाई ठरली आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून अमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि साठवणूक यांच्या विरोधात सातत्याने कारवाई केली जात आहे. ही मोहीम गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे व त्यांचे पथक राबवत आहे.

नवी मुंबई पोलिसांनी गेल्या पाच वर्षांत अमली पदार्थांशी संबंधित २३८७ गुन्हे दाखल करून ३२०० संशयित आरोपींना अटक केली. या कारवाईत १०७८ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. कारवाईबरोबरच अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत नागरिकांमध्ये आणि विशेषतः तरुणांमध्ये जनजागृती करण्यावर पोलिसांकडून भर दिला जात आहे. 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी विविध उपक्रम राबवले जात आहेत.

अमली पदार्थांबाबत माहिती देण्यासाठी पोलिसांनी ८८२८११२११२ हा हेल्पलाइन क्रमांक सुरू केला आहे. नागरिकांना अमली पदार्थांची विक्री, साठवणूक किंवा वाहतुकीबाबतची माहिती गोपनीय पद्धतीने पोलिसांना देता येणार आहे. अमली पदार्थांचे सेवन आणि तस्करी रोखण्यासाठी पोलिसांच्या कारवाईबरोबरच नागरिकांचा सहभागही महत्त्वाचा असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयात विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जेवर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे राबवण्यात येणाऱ्या रयत गुरुकुल प्रकल्पांतर्गत बाह्य तज्ज्ञ व्यक्ती मार्गदर्शन उपक्रमाद्वारे विद्युत महत्त्व या विषयावर विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. २९ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व विजेची बचत विषयांवर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय पाटील व महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता डॉ. अनिता चौधरी यांनी बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



यावेळी संजय पाटील यांनी दैनंदिन जीवनातील विद्युत ऊर्जेचे महत्त्व स्पष्ट करीत कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांसमोर मांडला. डॉ. अनिता चौधरी यांनी विद्युत सुरक्षा, हरित ऊर्जा व वीजबचत या विषयांवर विविध दैनंदिन उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. विद्युत उपकरणे हाताळताना घ्यावयाची काळजी, विजेची बचत करण्याच्या विविध पद्धती, सौरऊर्जेचे महत्त्व, हरित ऊर्जा म्हणजे काय आणि तिचा दैनंदिन जीवनात कसा वापर करता येतो याबाबत त्यांनी माहिती दिली. तसेच लहान वयात विद्युत उपकरणे हाताळताना विद्युत धक्का लागू नये यासाठी कोणती खबरदारी घ्यावी व विद्युत अपघात घडल्यास कोणती प्राथमिक काळजी घ्यावी याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आल्याने कार्यक्रम अधिक परिणामकारक ठरला.

कार्यक्रमास प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, शिक्षक रंजिता पाटील, चारुशीला ठाकूर, शीतलकुमार म्हात्रे तसेच माजी विद्यार्थी सुधीर ठाकूर उपस्थित होते. रयत गुरुकुल प्रकल्पांतर्गत इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना माळी, तर आभार विलासराव लेंभे यांनी मानले. विद्युत सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच ऊर्जा बचत व पर्यावरणपूरक ऊर्जेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरला.

# उरण तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी गोपीनाथ मुंडे अपघात सुरक्षा योजना

**उरण : प्रतिनिधी**

शेती व्यवसाय करताना होणाऱ्या अपघातांमुळे शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट ओढावू नये यासाठी राज्य सरकारने गोपीनाथ मुंडे शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, महिला शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना जाहीर केली आहे. या योजनेचा लाभ वहीतीधारक खातेदार शेतकऱ्यांसह भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांनाही मिळणार आहे.

शेतीच्या कामादरम्यान विविध कारणांनी अपघात होऊन शेतकरी किंवा कुटुंबातील सदस्याचा मृत्यू होतो अथवा कायमस्वरूपी अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीचा अपघात झाल्यास कुटुंबाच्या उपजीविकेवर मोठा परिणाम होतो. अशा परिस्थितीत आर्थिक आधार देण्यासाठी या योजनेत सानुग्रह अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे.

योजनेत वहीतीधारक खातेदार शेतकरी, भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकरी तसेच त्यांच्या कुटुंबातील आई-वडील, पती, पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी, घटस्फोटित मुलगी आणि विधवा मुलगी यांचा समावेश करण्यात आला आहे. १० ते ७५ वर्षे वयोगटातील पात्र सदस्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास संबंधित लाभार्थी अथवा कायदेशीर वारसदार सानुग्रह अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत.

ही योजना १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे अपघाताच्या घटनांमध्ये कुटुंबाला आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. कुटुंबातील पात्र व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास संबंधितांनी विलंब न करता उरण तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जनावरांच्या वाहतुकीप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** टेम्पोमध्ये जनावरांची दाटीवाटीने कोंबून वाहतूक केल्याप्रकरणी अखिल अहमद शाह यांच्याविरोधात २८ सप्टेंबर रोजी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वाहन क्रमांक एमएच ४७ बीवाय ४८२७चा टेम्पोचालक अखिल अहमद शाह यांनी टेम्पोमध्ये १६ जनावरे परवान्यात नमूद वजन क्षमतेपेक्षा जास्त वजनाची जनावरे दाटीवाटीने कोंबून वाहतूक केली आणि जनावरांना क्रूरतेची वागणूक दिली. याप्रकरणी पोलिसांनी टेम्पो आणि जनावरे ताब्यात घेतली.

# पनवेल महानगरपालिकेमध्ये माहिती अधिकार दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जाणारा २८ सप्टेंबर या दिवसाचे औचित्य साधून आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माहिती अधिकार दिन कार्यक्रम यशस्वीपणे आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. यावेळी यशदाचे मास्टर ट्रेनर जी.टी. महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.



यशदाचे मास्टर ट्रेनर जी.टी. महाजन यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विविध तरतुदी, सुलभ कार्यपद्धती आणि कायद्याच्या प्रभावी वापराबद्दल सखोल आणि मोलाचे मार्गदर्शन केले. दृकश्राव्य माध्यमाचा प्रभावी वापर करून कायद्याची माहिती सोप्या भाषेत पटवून देण्यात आली. यावेळी त्यांनी माहितीच्या अधिकारातील वैशिष्ट्ये व उद्दिष्ट्ये सोप्या भाषेत समजावून सांगितली. शासकीय कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता आणणे आणि उत्तरदायित्व निर्माण करणे हा या कायद्याचा मुख्य आत्मा असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. माहितीच्या अधिकारामुळे प्रशासनात नागरिकांचा सहभाग वाढून भ्रष्टाचार निर्मूलनास आणि लोकाभिमुख विकासाला गती मिळत असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, उपसचिव अक्षय कदम, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख कीर्ती महाजन, लिपिक विष्णू सांगळे यांच्यासह पालिकेचे विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. माहिती अधिकाराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि सुशासनाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत दिशादर्शक ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाचा समूहगीत स्पर्धेत द्वितीय क्रमांक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद विलेपार्ले शाखेच्या समूहगान स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठेच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. भारत विकास परिषदेतर्फे दरवर्षी समूहगीत स्पर्धा घेतल्या जातात. यंदा मुंबई आणि कोकण विभागातील स्पर्धा विलेपार्ले येथील पु. ल. देशपांडे सभागृहात पार पडल्या.




यात तब्बल २७ विद्यालयांनी सहभाग घेतला होता. लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संस्कृतमधील 'मनसा सतत स्मरणीयम' आणि 'चलो जवानो बढो जवानो' ही गीते सादर केली. सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर त्यांनी हे पारितोषिक प्राप्त केले. रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यालयाने विविध क्षेत्रांत असेच यश संपादन करावे, असे सांगितले. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहून अभ्यासासोबतच सर्वच क्षेत्रांत आपला ठसा उमटवावा, असे प्रतिपादन त्यांनी केले. विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच विद्यार्थी विविध क्षेत्रांत प्रगती दाखवत आहेत. संगीत विभागाच्या शिक्षकांनी परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सराव करून घेतला. पर्यवेक्षिका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले.

# एमएनएम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची अग्निशमन केंद्रात शैक्षणिक भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे एमएनएम विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालय, गव्हाण-कोपर येथील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सिडको अग्निशमन केंद्र, उलवे येथे शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. अग्निसुरक्षा व आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी याबाबत प्रत्यक्ष माहिती मिळावी हा या भेटीमागचा उद्देश होता. या क्षेत्रभेटीचे आयोजन प्राचार्या सायली वडवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



विद्यार्थ्यांसोबत कविता शेवाळे व प्रगती यशवंतराव या शिक्षिका उपस्थित होत्या. भेटीदरम्यान विजय गोसावी यांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन दलात वापरण्यात येणारी विविध सुरक्षा साधने तसेच अग्निशमन बंबाची सविस्तर माहिती दिली. अंबरनाथ भोईर यांनी अग्निशामक यंत्राचा योग्य वापर कसा करावा आणि आग लागल्यास कोणत्या सुरक्षा उपाययोजना कराव्यात याबाबत मार्गदर्शन केले. फायर इन्चार्ज प्रतीक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्निशमन जवानांनी अग्निशामक यंत्राचा प्रत्यक्ष वापर करून दाखवला. अग्निशमन बंबातून पाण्याचा मारा कशा प्रकारे केला जातो याचेही प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांनी या क्षेत्रभेटीत उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रात्यक्षिके पाहिली आणि अग्निसुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली. या प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली आणि आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षिततेचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले.

# सायकलवरून देवदर्शनाची शिवा ओझांची अनोखी तीर्थयात्रा



**नवी मुंबई : बातमीदार**

श्रद्धा, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर मध्य प्रदेशातील गुना जिल्ह्यातील शिवा ओझा यांनी सायकलवरून देशभरातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या दर्शनासाठी अनोखा आध्यात्मिक प्रवास सुरू केला आहे. तब्बल नऊ महिन्यांच्या या सायकल प्रवासात १२ ज्योतिर्लिंगे, चारधाम आणि ५१ शक्तिपीठांचे दर्शन घेण्याचा त्यांचा संकल्प आहे.

उत्तराखंडमधून या यात्रेला सुरुवात करत शिवा ओझा यांनी केदारनाथ, बद्रीनाथ, गंगोत्री, यमुनोत्री, मानागाव आणि हरिद्वार आदी तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेतले. यानंतर ओंकारेश्वर, उज्जैन, चित्रकूट, प्रयागराज, काशी विश्वनाथ, देवघर, कामाख्या देवी, कोलकाता काली मंदिर, ओडिशा, आंध्र प्रदेशातील तिरुपती बालाजी, मदुराई मीनाक्षी देवी, कन्याकुमारी, आदियोगी आणि तिरुवनंतपुरम येथील पद्मनाभस्वामी मंदिर अशा विविध पवित्र स्थळांना त्यांनी सायकलवरून भेट दिली आहे. सध्या शिवा ओझा यांचा सायकल प्रवास महाराष्ट्रात सुरू असून त्यांनी परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, वेरूळचे घृष्णेश्वर आणि नाशिकचे त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतले आहे. त्यानंतर बेलापूर येथून पुढील प्रवासासाठी ते हंपीच्या दिशेने मार्गस्थ झाले आहेत. या दीर्घ आणि आव्हानात्मक प्रवासादरम्यान २८ सप्टेंबर रोजी शिवा ओझा यांनी नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाड्यात एक रात्र विश्रांती घेतली.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी त्यांचे आपुलकीने स्वागत करत त्यांच्या या अनोख्या धार्मिक यात्रेबद्दल कौतुक केले. विश्रांतीनंतर त्यांनी पुन्हा सायकलवरून पुढील प्रवासाला सुरुवात केली आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत आशा स्वयंसेविकांची कार्यशाळा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने आशा स्वयंसेविकांसाठी गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदानतंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायद्याविषयी कार्यशाळा घेण्यात आली. मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात आयोजित कार्यशाळेला आशा स्वयंसेविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ज्ञान हा जबाबदार वर्तनाचा पाया असून या कार्यशाळेला मिळालेला प्रतिसाद समाधानकारक असल्याचे मत आरोग्य समितीचे सभापती डॉ. जयाजी नाथ यांनी व्यक्त केले.



यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, मुख्य विधी अधिकारी अभय जाधव आणि इतर मान्यवर उपस्थित होते. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे म्हणाले, कायद्याची सर्वसाधारण माहिती सर्वांना असते, मात्र त्यातील बारकावे समजावेत आणि अंमलबजावणी करताना आशा स्वयंसेविकांना आपली भूमिका स्पष्ट व्हावी यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समाजातील स्त्री-पुरुष प्रमाण समान असणे हे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने हिताचे असल्याने सर्वांनी सजग असणे गरजेचे आहे. सहायक आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण यांनी सादरीकरणाद्वारे पीसीपीएनडीटी कायद्याची व त्यातील तरतुदींची सविस्तर माहिती दिली.

स्त्रीभ्रूणहत्या रोखणे व गर्भलिंग निदान चाचण्यांना प्रतिबंध घालणे हा कायद्याचा उद्देश साध्य करण्यासाठी समाजात मिसळणाऱ्या आशा स्वयंसेविकांची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी कान, डोळे उघडे ठेवून वावरावे आणि संशयास्पद प्रकार जाणवल्यास महापालिका आरोग्य विभागाच्या प्रमुखांना माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मुख्य विधी अधिकारी अभय जाधव यांनी कायद्यातील तरतुदींची विश्लेषणात्मक माहिती दिली. सामाजिक समतोल राखण्यासाठी या कायद्याची अंमलबजावणी किती महत्त्वाची आहे हे त्यांनी विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर शिक्षा व दंडात्मक तरतुदी लागू होतात. उल्लंघनाची खबर देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवून शासनामार्फत एक लाख रुपयांचे बक्षीस दिले जाते, असेही त्यांनी सांगितले.

# खोपोली, खालापुरात वादळी पाऊस

## झाडे, विद्युत खांब कोसळले; वीजपुरवठा खंडित





**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

खोपोलीसह खालापुरात परतीच्या पावसाने मंगळवारी सायंकाळी धुमाकूळ घातला. सुमारे अर्धा तास मेघगर्जनेसह वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस बरसला. त्यामुळे काही ठिकाणी पाणी साचले तसेच वीजपुरवठा खंडित झाला. काही ठिकाणी झाडे, विजेचे खांब कोसळून मार्गच बंद झाला.

खोपोली युनिमाऊंटजवळ सेफ्टीसाठी लावलेले पत्रे रस्त्यावर पडले. मिळ गावात घरांचे पत्रे, पाण्याच्या टाक्या उडाल्या. शेडवली, चिंचवलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर झाड कोसळून वाहतूक बाधित झाली. बोरघाटातून येताना खोपोली एक्झिट ते मीळगाव ठाकूर वाडीदरम्यान इलेक्ट्रिक पोल वायरसकट रस्त्यावर पडल्याने वाहतूक खोळंबली. खोपोली रेस्ट हाऊसजवळील हायवेवर झाडाची फांदी तुटून मार्गावर पडली होती, ती सामाजिक कार्यकर्त्यांनी दूर केली.

सुमारे अर्ध्या तासानंतर खोपोली शहरातील पाऊसाचा जोर मंदावला व मेघगर्जना थांबल्या, मात्र अवघ्या काही मिनिटांत पावसाने हाहाकार माजवला, तर खालापुरातील विणेगाव, भिलवले, चौक येथे मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे महामार्ग खोपोली एक्झिट हेल्प फाउंडेशन आणि खोपोली फायर ब्रिगेडची टीम युद्धपातळीवर परिस्थिती पूर्ववत आणण्याच्या प्रयत्न करीत होते. अडथळे दूर केल्यानंतर महामार्गावरील वाहतूक सुरळीत झाली.

यादरम्यान शिषगाव येथे मुजफ्फर पटेल यांच्या घराच्या शेजारील परिसरात एक झाड पडले. मस्जिदीच्या पाठीमागील मुख्य रस्त्यावर झाड पडले. पटेल नगर येथेही महमूद सय्यद यांच्या घरासमोरील मुख्य रस्त्यालगत झाड पडले. शिळगाव स्मशानभूमीसमोरील झाड कोसळले.

खालापूर व खरसुंडी फिदरवरील लाईन तुटल्याने ग्रामीण भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता. ग्रामीण भागातही विजांच्या कडकडाटासह वारा पावसाने धुमाकूळ घातला. लौजी रस्त्यावर झाड पडल्याने क्रिकेट ग्राउंड रस्ता बंद झाला. झाड काढण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा पालीत सत्कार

**पाली : प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) सुधागड तालुका यांच्या वतीने पाली येथील लिमये हॉलमध्ये केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात झाला. मंत्रिपदाच्या दशकपूर्तीनिमित्त हा गौरव करण्यात आला.

या सोहळयास माजी खासदार तथा भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, रिपाइंचे कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, जिल्हाध्यक्ष नरेंद्रभाई गायकवाड, जिल्हा संपर्कप्रमुख राहुल सोनावळे, युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक, कोकण प्रदेश संघटक रवींद्रनाथ ओव्हाळ, जिल्हा प्रवक्ते मोहन गायकवाड, सुधागड तालुकाध्यक्ष भगवान शिंदे, जिल्हा युवक सचिव ॲड. सुशील गायकवाड, कार्याध्यक्ष निशांत पवार, संघटक गोपीनाथ सोनावणे, तालुका युवक अध्यक्ष भावेश गायकवाड, राहुल महाडिक, प्रशांत वाघमारे, सतीश गायकवाड, श्रेयश भालेराव, मिलिंद शिंदे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी सत्काराला उत्तर देताना ना. रामदास आठवले म्हणाले की, तुमचं गाव आहे पाली, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर आपले वाली. पुढे ते म्हणाले की, देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, आमदार, खासदार, मंत्री, लोकप्रतिनिधी सारेच संविधानाला साक्ष ठेवून शपथ घेतात. जोपर्यंत सूर्य चंद्र तारे आहेत तोपर्यंत संविधान अबाधित राहील.



# माणगाव बिगरशेती सहकारी पतसंस्थेची सभा



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोलच्या भागधारकांची (सभासदांची) अठ्ठावीसवी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्था कार्यालयात चेअरमन आनंदशेठ यादव यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

संस्थेचे व्यवस्थापक पुंडलिक गायकवाड यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले व ते इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. चेअरमन आनंदशेठ यादव यांनी सांगितले की, संस्थेची सभासद संख्या १७८५ इतकी असून वसूल भागभांडवल एक कोटी ७७ लाख ८५ हजार रुपये इतकी आहे.

संस्थेत २७ कोटी २६ लाख ८८ हजार रुपयांच्या ठेवी आणि ९६९५ इतकी ठेवीदार संख्या आहे. संस्थेतर्फे आतापर्यंत २० कोटी ३८ लाख रुपये इतके कर्ज वाटप करण्यात आले आहे. संस्थेची थकबाकी नेट एनपीए १.४९%, गुंतवणूक ११ कोटी १० लाख ५१ हजार रुपये, तर निव्वळ नफा ४७ लाख २३ हजार रुपये इतका आहे. पतसंस्था १ फेब्रुवारीला वर्धापनदिनी नवीन प्रशस्त जागेत स्थलांतरित होणार आहे, असेही सांगितले.

या सभेला संस्थेचे संचालक दिलीप जाधव, उदय म्हशेलकर, दिलीप अंबुर्ले, संदीप खरंगटे, अरुण प्रभाळे, सभासद बळीराम मोरे, माजी नगरसेवक जयंत बोडेरे आदींसह भागधारक (सभासद),कर्मचारी वृंद,स्वल्पबचत प्रतिनिधी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालवाहतुकीतून मध्य रेल्वेची मोठी कमाई

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत १३,०५८ रेकद्वारे ३४.४८ दशलक्ष टन मालवाहतुकीची उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. गेल्या वर्षी याच कालावधीत १२,३६९ रेकद्वारे ३२.१० दशलक्ष टन मालवाहतुक झाली होती तसेच रेकच्या संख्येतही ६८९ रॅकची वाढ झाली आहे.

या कालावधीत मालवाहतुकीतून एकूण ३,४६१.९२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले, जे मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीतील ३,३४६.८० कोटी रुपयांच्या उत्पन्नापेक्षा अधिक आहे.

एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीसाठी एकूण ३४.४८ दशलक्ष टन मालवाहतुकीपैकी नागपूर विभागाने २०.३१ दशलक्ष टन (५८.९०%) मालवाहतूक करून सर्वाधिक योगदान दिले आहे. त्यानंतर मुंबई विभागाने ८.५६ दशलक्ष टन (२४.८३%) मालवाहतूक केली आहे. एकूण ३,४६१.९२ कोटी रुपयांच्या उत्पन्नापैकी नागपूर विभागाने सर्वाधिक २,०७२.७३ कोटी रुपयांचे (५९.८७%) उत्पन्न मिळवले आहे; त्यानंतर मुंबई विभागाने ८००.४९ कोटी रुपयांचे (२३.१२%) उत्पन्न मिळवले आहे.

एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत ऑटोमोबाईल लोडिंग ४५१ रेक्सपर्यंत वाढले. गेल्या वर्षीच्या याच कालावधीत हे प्रमाण ३५७ रेक्स इतके होते, म्हणजेच यात ९४ रेक्सची वाढ झाली आहे.


**शुध्दीपत्रक क्र. २**

**(ई-निविदा सुचना क्र. २० सन २०२६-२७)**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र जा.क्र. पवि/लेशा/निविदा/३७१५, दि. ०९.०९.२०२६**

| प्रसिध्द झालेले | सुधारीत वाचावे |
|---|---|
| १. ऑनलाईन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक २२/०९/२०२६ ते २९/०९/२०२६ (१८.००) वाजेपर्यंत | ऑनलाईन निविदा विक्रीचा कालावधी दिनांक २६/०९/२०२६ ते ०३/१०/२०२६ (१८.००) वाजेपर्यंत |
| २. निविदा उघडण्याचा दिनांक ०१/१०/२०२६ रोजी १५.०० वा. (शक्य झाल्यास) | निविदा उघडण्याचा दिनांक ०५/१०/२०२६ रोजी १५.०० वा. (शक्य झाल्यास) |

( सदर निविदेसूचनेमध्ये अथवा निविदेत काही बदल होत असल्यास खालील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)

१. http://mahatenders.gov.in

जा.क्र. सावांवि/पनवेल/ई-निविदा/२०२६/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल

सही/-
उपकार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल




नागोठणे : श्रीकृष्ण जन्माष्टमी आनंदोत्सवानिमित्त इस्कॉन परिवाराच्या वतीने कृष्ण गौर प्रभू यांच्या हस्ते भाजप व्यापारी सेल रायगड जिल्हाध्यक्ष सचिन मोदी यांचा सन्मान करण्यात आला.



नागोठणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन व संगीता जैन यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या साखरचौथ गणपतीचे दर्शन घेताना राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, पळस उपसरपंच चंद्रकांत भालेकर, माजी सरपंच निष्ठा विचारे व इतर. सोबत सुरेश जैन, कार्तिक जैन.



मुरूड : गौरा गणेशोत्सव अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे विराजमान पंचक्रोशीचा राजा.


सिडको
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधिताना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र/करारनामा देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/करारनामा संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जि.रायगड | | | | |
| १ | करंजाडे २९ | करंजाडे १४०अ<br>करंजाडे १४०ब<br>**एकुण संपादित क्षेत्र** | २२अ/१ब/२<br>२२अ१/ब/२<br>२२अ/३ | ०-२९-०<br>०-१३-२<br>०-०४-०<br>**०-४६-२** | ४०० चौ.मी. | मौजे करंजाडे, सेक्टर ६, भूखंड क्र. A१२०/A+ A१२०/B, क्षेत्र ३९९.६० चौ.मी. | **कै. गोविंद वालजी जेठवा उर्फ कुंभार (मयत) (मृत्यू दि. १२/१०/१९९७) कै. देवीदास गोविंद जेठवा उर्फ कुंभार (मयत) (मृत्यू दि. २३/८/२००९) व कै. रामीबाई वालजी जेठवा (मयत) (मृत्यू दि. १५/४/१९६२) यांचे वारस**<br>१. श्री लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>२. श्री चंद्रकांत गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>३. श्री विजय गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>४. श्री प्रकाश गोविंदजी जेठवा उर्फ कुंभार<br>५. श्रीमती नर्मदा जयकिशन देवलीया<br>६. श्रीमती कांताबेन आनंदजी चित्रोड उर्फ प्रजापती<br>७. श्रीमती पद्मा उर्फ पन्ना सुरेश सोरथीया<br>८. श्रीमती धर्मीष्ठा देवीदास जेठवा उर्फ कुंभार<br>९. श्री अतुल देवीदास जेठवा उर्फ कुंभार<br>१०. श्री बिना कूंदन देवलिया<br>११. श्री जिग्नेश देवीदास जेठवा उर्फ कुंभार हे आहेत.<br>वारसदाखला क्र CMA No.२४०/२०१३<br>**कै. नर्मदा जयकिशन उर्फ जेठालाल देवालिया मयत (मृत्यू दि. २०/०७/२०२०) यांचे वारस**<br>१. श्री. प्रदीप जयकिशन उर्फ जेठालाल देवालिया<br>वारसदाखला क्र CMA No.४९८/२०२०<br>**कै. लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास गोविंद जेठवा उर्फ कुंभार मयत (मृत्यू दि. ३०/०८/२०१५) यांचे वारस**<br>१. श्रीमती. भानुमती लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास जेठवा उर्फ कुंभार<br>२. श्री. योगेश लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास जेठवा उर्फ कुंभार<br>३. श्रीमती. रिना लक्ष्मीकांत उर्फ लक्ष्मीदास जेठवा उर्फ कुंभार उर्फ रिना सुधीर चावडा<br>वारसदाखला क्र CMA No.४६७/२०१६ | |
| २ | रोडपाली ८० | ७६ | १३७/० | ०-२८-३ | २५० चौ.मी. | भूखंड क्र. १४ ब, सेक्टर ८ई, क्षेत्र २५० चौ.मी. कळंबोली नोड | **कै. चंपुबाई दत्तात्रेय गुजराथी (मयत) व इतर यांचे वारस–**<br>**१. श्री दिनेश रमाकांत गुजराथी व**<br>**२. श्री. नवनित जयवंत गुजराथी** | निरंक |
| ३ | नवघर – ९३२ | ३५६/ ८५-८६ | ३१८/१अ<br>३२०/७<br>३२९/३<br>३३५/१<br>३३९/४<br>३५१/८<br>३४९/५ब | ०-१७-२<br>०-१४-८<br>०-२४-८<br>०-१०-०<br>०-०७-०<br>०-१६-०<br>०-०२-३ | ४०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी येथील भुखंड क्र. १६७, सेक्टर-६५, क्षेत्र ४०० चौ.मी. | **कै. मोतीराम शिवा पाटील (मयत) यांचे वारस**<br>१. श्री. सदानंद मोतीराम पाटील<br>२. श्री. धनाजी उर्फ धनंजय मोतीराम पाटील<br>३. श्रीमती. लताबाई हरीभाऊ पंडीत<br>४. श्रीमती. मंदाबाई परशुराम मढवी<br>५. श्रीमती. बामीबाई हरेश्वर भगत | उरण येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर येथील RCS १३/२००९ दाव्यानुसार १) धनाजी उर्फ धनंजय मोतीराम पाटील यांना ४०० चौमी. २)सदानंद मोतीराम पाटील व इतर ३ यांना ४०० चौ.मी. हिस्साचे वाटप करण्याचे आदेश दिले. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह बाब निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण/पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२४०/२०२६-२७

# भारतीय तिरंदाजांची सुवर्ण हॅट्ट्रिक

**नागोया : वृत्तसंस्था**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई खेळ स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी विजयाची मालिका कायम ठेवत देशासाठी ऐतिहासिक सुवर्णपदकांची कमाई केली आहे. महिलांच्या कंपाऊंड तिरंदाजी संघाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. यानंतर अवघ्या काही वेळातच कंपाउंड मिक्स संघानेही सुवर्णपदकावर निशाणा सधला. मग पुरुष संघाने सुवर्णपदकाला गवसणी घातली.

महिलांच्या कंपाऊंड तिरंदाजीच्या अंतिम सामन्यात ज्योती सुरेखा वेन्नम, प्रथिका प्रदीप आणि चिकिथा तनिपार्थी यांच्या भारतीय त्रिकूटाने





चीनच्या संघाला २३८–२३४ अशा फरकाने नमवत सुवर्णपदक पटकावले. या विजयादरम्यान भारतीय महिला संघाने २०१४मध्ये दक्षिण कोरियाने नोंदवलेल्या २३८ गुणांच्या जागतिक विक्रमाची बरोबरी केली.

कंपाउंड मिक्स संघानेही सुवर्णपदक पटकाविले. मराठमोळा तिरंदाज साहील जाधव आणि चिकिता तनीपर्थी यांच्या जोडीने अटीतटीच्या लढतीत दक्षिण कोरियाच्या संघाला पराभूत करत सुवर्णपदक जिंकले. भारताच्या जोडीने सुरुवातीपासूनच दबदबा राखला. चिकिता आणि साहिल यांनी अंतिम सामन्यातील सुरुवातीच्या दोन्ही सेटमध्ये सर्व बाण १०वर मारून पहिल्या हाफमध्ये ८०–७८ अशी दोन गुणांची आघाडी घेतली. अटीतटीचा झालेला हा सामना शेवटी १५७–१५७ अशा बरोबरीत राहिल्यानंतर शूट–ऑफमध्ये पोहचला. तिथे चिकिता आणि साहिल यांनी बाजी मारली.

भारताच्या तिरंदाज साहिल जाधव, कुशल दलाल व गणेशमणी रत्नम यांच्या पुरुष संघाने देशाला आणखी एक सुवर्णपदक जिंकून दिले. अंतिम सामन्यात भारतीय पुरुष संघाचा सामना चीनशी झाला आणि तिसऱ्या सेटपर्यंत भारत एका गुणाने पिछाडीवर होते. चौथ्या आणि अंतिम सेटमध्ये त्यांनी आघाडी घेतली आणि अखेरीस २३८–२३७ अशा गुणांनी सामना जिंकत सुवर्णपदक आपल्या नावे केले.

# नीरू धांडाची पुन्हा कमाल!

## कायनान चेनाईसोबत ट्रॅप मिक्स्डमध्ये सुवर्णपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय नेमबाज नीरू धांडाने यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आणखी एका सुवर्णपदकाची भर घातली आहे. जपानमधील आयची–नागोया येथे झालेल्या ट्रॅप मिक्स्ड प्रकारात नीरूने कायनान चेनाईसोबत खेळताना सुवर्णपदक पटकावले. भारतीय जोडीने अंतिम फेरीत ३४ गुण मिळवत अव्वल स्थान मिळवले.

या स्पर्धेत कतारच्या जोडीने ३२ गुणांसह रौप्यपदक मिळवले, तर चीनला २३ गुणांसह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. भारतीय जोडीने संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत सुरुवातीपासूनच आपले स्थान मजबूत ठेवले.

भारताने पहिल्या मालिकेत सहा गुण मिळवले. त्यानंतर दुसऱ्या मालिकेत एकूण गुणसंख्या १६वर पोहचली. तिसऱ्या मालिकेनंतर भारताच्या खात्यात २६ गुण जमा झाले. अखेर चौथ्या मालिकेत दमदार कामगिरी करत भारतीय जोडीने ३४ गुणांसह सुवर्णपदकावर नाव कोरले.

नीरू धांडासाठी या आशियाई क्रीडा स्पर्धेतील हे तिसरे पदक ठरले आहे. यापूर्वी तिने महिलांच्या ट्रॅप सांघिक प्रकारात रौप्यपदक मिळवले होते. त्यानंतर वैयक्तिक ट्रॅप प्रकारात सुवर्णपदक जिंकत तिने विशेष कामगिरी केली होती. ट्रॅप



शूटिंगमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली.

आता ट्रॅप मिक्स्ड प्रकारातील सुवर्णपदकामुळे नीरूच्या पदकांची संख्या आणखी वाढली आहे. तिच्या खात्यात वैयक्तिक प्रकारातील सुवर्णपदक, सांघिक प्रकारातील रौप्यपदक आणि मिश्र सांघिक प्रकारातील सुवर्णपदक जमा झाले आहे.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे तायक्वांदो स्पर्धेत यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय पनवेल येथे १७ व १९ वर्षाखालील मुले व मुलींची जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाने यश प्राप्त केले.

गौरी मोहन कोळी (इ.१२वी), पुष्कराज देवदास पाटील (इ.१२वी), ऋषभ रामदास कावळे (इ.११वी) यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. या सर्व तायक्वांदो स्पर्धकांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याशिवाय अक्षता शैलेश कदम (इ.१२वी), वैदेही दिनेश भोपी (इ.११वी), अथर्व नामदेव देसाई ( इ.१२वी) यांनी द्वितीय क्रमांक, तर जिज्ञा अनंत पाटील (इ.११वी), वर्धन मच्छिंद्र म्हात्रे (इ.११वी) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील, माधवी कोळी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# ॲथलेटिक्स स्पर्धेत सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे यश

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रीडा असोसिएशन यांच्या वतीने कळंबोली येथे आयोजित ॲथलेटिक्स स्पर्धा २०२६मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन केले.

या स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी धावणे, चालणे आणि गोळाफेक या क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी केली. धावण्याच्या तीन हजार मीटर शर्यतीत जय कुकरेजा याने द्वितीय क्रमांक, ८०० मीटर शर्यतीत आरुष पंडित याने प्रथम क्रमांक, तर ४०० मीटर शर्यतीमध्ये अनिकेत सिंघा याने प्रथम क्रमांक पटकावला.

तीन हजार मीटर चालण्याच्या स्पर्धेत मेघना कुडाळे हिने प्रथम क्रमांक प्राप्त केली असून गोळाफेक स्पर्धेत प्रत्याक्ष कारिया याने द्वितीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण सराव, मेहनत तसेच संग्राम फोफेरकर व वृषाली लोखंडे या क्रीडा शिक्षकांचे योगदान आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, शिक्षकवृंद व पालक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# बीसीसीआयच्या अंतरिम निवड समिती प्रमुखपदी प्रज्ञान ओझा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचे माजी खेळाडू अजित आगरकर यांचा निवड समितीतील कार्यकाळ संपला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या मायदेशातील एकदिवसीय मालिकेसाठी संघ निवडताना निवड समितीचे प्रमुख ही अखेरची जबाबदारी त्यांनी पार पाडली. दरम्यान, बीसीसीआयने निवड समितीचे तात्पुरते प्रमुख असलेल्या नावाची घोषणा केली आहे.

माजी भारतीय डावखुरा फिरकीपटू प्रज्ञान ओझा याची सध्याच्या चार सदस्यीय निवड समितीच्या अंतरिम प्रमुखपदी नियुक्ती केल्याचे वृत्त आहे. २४ कसोटी सामने खेळलेला ओझा पुढे अधिकृतपणे निवड समितीचे प्रमुख म्हणूनही बढती मिळण्याची शक्यता आहे.

गुवाहाटीतील बरसापारा स्टेडियममध्ये मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीच्या चार विद्यमान सदस्यांमध्ये शिवसुंदर दास, अजय रात्रा, आर.पी. सिंह आणि प्रज्ञान ओझा यांच्यात दीर्घ चर्चा झाल्याचे पाहायला मिळाले. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात मालिकेतील दुसरा सामना याच मैदानावर होणार होता, मात्र आगरकर या चर्चेदरम्यान उपस्थित नव्हते.

# पंत म्हणतो, सर्वच विराट कोहली नसतात!



**नवी दिल्ली** : वनडे आणि टी–२० संघातील स्थान गमावल्यानंतर ऋषभ पंतने आपल्या कमबॅकबाबत वक्तव्य केले आहे. बिझनेस ऑफ स्पोर्ट पॉडकास्टमध्ये बोलताना पंतने विराट कोहलीचे उदाहरण देत अडथळे आणि पुनरागमनाबाबत भाष्य केले.

बिझनेस ऑफ स्पोर्ट पॉडकास्टमध्ये बोलताना ऋषभ पंत म्हणाला की, "नक्कीच, वाईट वाटते, पण एक खेळाडू म्हणून एक गोष्ट समजून घ्यावी लागते. ती म्हणजे, जेव्हा अडथळे येतात, तेव्हा पुनरागमनही होते." भारताचा अनुभवी फलंदाज विराट कोहलीचे उदाहरण देताना तो म्हणाला, "एक खेळाडू म्हणून कामगिरीचा आलेख नेहमीच खाली वर जात असतो, सर्वच विराट नसतात. त्याची कारकिर्द खूप असाधारण राहिली आहे."

# वरिष्ठ खेळाडू रणजी स्पर्धा खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघ सध्या दोन वेगवेगळ्या ठिकाणी क्रिकेट सामने खेळत आहेत. भारताचा एकदिवसीय संघ मायदेशात वेस्ट इंडिजविरूद्ध खेळत आहे, तर टी–२० संघ जपानमध्ये आशियाई क्रिडा स्पर्धा खेळत आहे. यानंतरही भारताचे खेळाडू रणजी स्पर्धेत खेळताना दिसू शकतात. बीसीसीआयकडून खेळाडूंना तसे आदेश देण्यात आले आहेत.

शुबमन गिल आणि केएल राहुल सध्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत व्यस्त आहेत, तर जसप्रीत बुमराह आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी जपानला गेला आहे, पण न्यूझीलंडचा आगामी दौरा लक्षात घेऊन बीसीसीआयने दिलेल्या निर्देशामुळेच गिल, राहुल आणि बुमराह रणजी करंडक स्पर्धेत खेळताना दिसण्याची शक्यता आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेसाठी पुरेशी तयारी करण्याच्या उद्देशाने बीसीसीआयने ही सूचना दिली आहे.

एका वृत्तानुसार न्यूझीलंड दौऱ्यापूर्वी प्रत्येक वरिष्ठ खेळाडूला किमान एक 'रेड–बॉल' सामना खेळणे अनिवार्य असेल. बीसीसीआयच्या या आदेशानंतर गिल आणि राहुल हे आपापल्या राज्य संघांकडून रणजी करंडक सामने खेळताना दिसू शकतात. रणजी करंडक स्पर्धेचा हंगाम ११ ऑक्टोबरपासून सुरू होत असून यात गिल पंजाबकडून, तर राहुल कर्नाटक संघाकडून खेळण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, न्यूझीलंड दौऱ्यापूर्वी जसप्रीत बुमराह रणजी करंडकातील एखादा सामना किंवा 'इंडिया ए' संघासाठी 'रेड–बॉल' सामना खेळणार आहे.

**किमान एक सामना अनिवार्य**

भारताचा न्यूझीलंड दौरा २२ ऑक्टोबरपासून सुरू होत असला, तरी १९ नोव्हेंबरपासून संघाची दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळली जाणार आहे. 'रेड–बॉल' क्रिकेटचा (लाल चेंडूने खेळल्या जाणाऱ्या सामन्यांचा) कोणताही सराव न करता या मालिकेत उतरल्यास उद्भवणाऱ्या परिणामांना सामोरे जाण्याची बीसीसीआयची इच्छा नाही; म्हणूनच सर्व वरिष्ठ खेळाडूंसाठी अशा प्रकारचा किमान एक सामना खेळणे अनिवार्य करण्यात आले आहे.





# रोहित शर्माने शतकी खेळीसह वर्ल्डकपसाठी ठोकला दावा!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजने दुसऱ्या वनडे सामन्यात भारताला ४०५ धावांचे मोठे आव्हान दिले होते. या सामन्यात रोहित शर्माकडून फार अपेक्षा होत्या. त्या अपेक्षा रोहित शर्माने खऱ्या करून दाखवल्या. विजयी धावांचा पाठलाग करताना रोहितने वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना सळो की पळो करून सोडले. त्याने ७२ चेंडूत १० चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने १०० धावा पूर्ण केल्या.

वनडे क्रिकेटमध्ये एखाद्या विशिष्ट संघाविरुद्ध सर्वाधिक षटकार ठोकणाऱ्या खेळाडूंच्या यादीत भारताचा 'हिटमॅन' रोहित शर्मा कमालीचा रेकॉर्ड आहे. या यादीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध तब्बल ९३ षटकार ठोकून पहिल्या स्थानावर आहे. आता वेस्ट इंडिजविरुद्धही त्याने आतापर्यंत ४०हून अधिक मारून आपला दबदबा निर्माण केला आहे. ख्रिस गेल इंग्लंडविरुद्ध ८५, शाहिद आफ्रिदी श्रीलंकेविरुद्ध ६३, सनथ जयसूर्या पाकिस्तानविरुद्ध ५३, शाहिद आफ्रिदी भारताविरुद्ध ५१, शाहिद आफ्रिदी न्यूझीलंडविरुद्ध ५०, शाहिद आफ्रिदी झिम्बाब्वेविरुद्ध ४७ आणि रोहित शर्मा वेस्ट इंडिजविरुद्ध ४१ षटकार मारले आहेत.

१२ हजारांचा पल्ला गाठला

भारताचा 'हिटमॅन' रोहित शर्माने २८२ डावांमध्ये १२ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. यासह त्याने महान फलंदाज सचिन तेंडुलकरला मागे टाकत जगातील दुसरा सर्वात जलद फलंदाज बनण्याचा बहुमान मिळवला आहे. या विक्रमी शर्यतीत भारताचा 'किंग' विराट कोहलीने अवघ्या २४२ डावात हा पल्ला गाठला आहे. सचिन तेंडुलकर ३०० डावांसह या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. १२ हजार धावांच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठी रोहितने १२,९७३ चेंडूंचा सामना केला. या विक्रमातही 'किंग' विराट कोहली पहिल्या स्थानावर असून त्याने १८८५३ चेंडू खेळले होते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com